R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
NAVAKAL
१०१ शतकपूर्ती
• मुंबई, सोमवार २७ मार्च २०२३ • वर्ष-१०१, अंक-२०, पाने-८, किंमत : ₹ ५
• Issue - 20 Vol.- 101 Marathi - Daily - Mumbai, 27 March, 2023 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

नवाकाळ शतकोत्सव
भाग्यवान वाचक स्पर्धा
१ फेब्रुवारी ते ३१ मार्च बाजूला दिलेले एक कुपन रोज तक्त्यावर चिकटवा.
नवाकाळ शतकोत्सव
कुपन क्र. ५४

प्रियांका गांधींचा राजघाटावर राहुलसाठी सत्याग्रह

मी 'रद्दबातल खासदार'! राहुल गांधींचा संताप पुन्हा उघड

■ नवी दिल्ली

दिल्लीत महात्मा गांधी स्मारकावर पोलिसांची परवानगी नसतानाही सत्याग्रहाचा कार्यक्रम काँग्रेसने केला. काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी-वाड्रा आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली हा संकल्प सत्याग्रह कार्यक्रम राजघाटाबाहेर झाला. प्रियांका गांधींनी भाषणाची सुरुवातच वडील राजीव गांधींच्या अंत्ययात्रेच्या एका आठवणीपासून केली. त्या म्हणाल्या, '३२ वर्षांपूर्वी मे १९९१ मध्ये माझ्या वडिलांची अंत्ययात्रा त्रिमूर्ती भवनातून निघाली होती. आई आणि राहुलसोबत मी गाडीत होते. पुढे एका सजलेल्या गाडीत माझ्या वडिलांचे पार्थिव



काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्यानंतर आज त्यांची बहीण मैदानात उतरली. काँग्रेसच्या महासचिव प्रियांका गांधी राजघाटावर पोहोचल्या आणि पोलिसांचे बंदीचे आदेश तोडत त्यांनी सत्याग्रह सुरू केला. त्याचवेळी मोदी सरकारच्या कारवाईवर पुन्हा संताप व्यक्त करीत राहुल गांधी यांनी आज 'खासदार' स्टेट्स बदलत 'रद्दबातल केलेला खासदार' असे स्टेट्स ठेवले.

होते. थोड्या वेळाने राहुल म्हणाला मला उतरायचे आहे. हट्ट करत तो गाडीतून उतरला आणि सैन्यांच्या ट्रकमागोमाग

तो उन्हात आपल्या वडिलांच्या अंत्ययात्रेत चालत चालत राजघाटापर्यंत पोहोचला. या जागेजवळ माझ्या शहीद वडिलांवर माझ्या भावाने अंत्यसंस्कार केले. माझ्या वडिलांचे पार्थिव तिरंग्यात लपेटले होते. या शहीद वडिलांचा अपमान भर संसदेत होतो. त्या शहिदाच्या मुलाला तुम्ही देशद्रोही म्हणता. तुमचे मंत्री माझ्या आईचा अपमान करतात. तुमचे एक मंत्री म्हणतात की, राहुल गांधींना माहितच नाही की त्याचे वडील कोण आहेत. तुमचे पंतप्रधान भर संसदेत उभे राहून बोलतात की हा परिवार नेहरुंचे नाव का नाही लावत? ते आमच्या संपूर्ण कुटुंबाचा अपमान करतात. काश्मिरी पंडितांच्या प्रथेचा अपमान करतात ज्याअंतर्गत मुलगा वडिलांच्या निधनानंतर पगडी परिधान करून परंपरा पुढे नेतो. पण तुम्हाला या अपमानासाठी कोणतीच पान ७ वर

इस्त्रोकडून एकाचवेळी ३६ उपग्रहांचे प्रक्षेपण

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने आज, रविवारी एकाचवेळी ३६ उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण केले. ब्रिटिश कंपनीच्या उपग्रहांना घेऊन एलव्हीएम-३ रॉकेटने सकाळी ९ वाजता श्रीहरिकोटा येथून अवकाशात उड्डाण घेतले. विशेष म्हणजे हे रॉकेट आपल्यासोबत अंतराळात ३६ सॅटेलाइट एकत्र घेऊन गेल्याने एक वेगळा इतिहास रचला गेला आहे.

■ नवी दिल्ली

इस्त्रोच्या साडे ४३ मीटर लांबीच्या या रॉकेटने ब्रिटेनच्या एका कंपनीचे ३६ उपग्रह आपल्यासोबत घेऊन अवकाशात झेप घेतली. उपग्रहांना घेऊन एलव्हीएम-३ ने झेप घेतल्यानंतर त्याचे एकूण वजन ५ हजार ८०५ टन होते. या मिशनला 'एलव्हीएम-३/वनवेब इंडिया-२' असे नाव देण्यात आले आहे. इस्त्रोने ट्वीट करून या मिशनच्या लॉंचिगची माहिती दिली. एलव्हीएम-३ इस्त्रोचा सर्वात मोठा रॉकेट आहे ज्याने आतापर्यंत पाच वेळा यशस्वी उड्डाण केले आहे. ज्यामध्ये चंद्रयान-२ मिशनसुद्धा सहभागी आहे.

ब्रिटेनच्या वनवेब ग्रुप कंपनीने इस्त्रोच्या वाणिज्यिक शाखा न्यूस्पेस इंडिया लिमिटेडपासून ७२ उपग्रह लॉंच करण्याचा करार केला आहे. यामध्ये २३ ऑक्टोबर २०२२ रोजी २३ उपग्रह इस्त्रोने यापूर्वीच लॉंच केले होते. आज उर्वरित २३ उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत जाणार आहेत. इस्त्रोच्या या लॉंचिगमुळे पृथ्वीच्या कक्षेत वेब वन कंपनीचे उपग्रहांची एकूण संख्या ६१६ होणार. इस्त्रोचा या वर्षीचा हा दुसरा लॉंच आहे. ही लॉंचिग यशस्वी झाल्यास वनवेब इंडिया-२ स्पेस मध्ये ६०० पेक्षा जास्त लोअर अर्थ ऑर्बिट उपग्रहांचे तारामंडळ पूर्ण करेल. सोबतच यामुळे जगातील प्रत्येक स्पेस आधारीत ब्रॉडबँड इंटरनेट योजनामध्ये मदत मिळणार आहे.

मुख्यमंत्री शिंदेंनी घेतली राज ठाकरेंची सदिच्छा भेट

चर्चांना उधाण

■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी सहकुटुंब मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यानंतर

राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले. आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र मागील काही दिवसात घडलेल्या राजकीय वादविवादांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे पाहण्यात येत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात चौफेर फटकेबाजी करताना ठाकरे गटासह शिंदे गटालाही टोले लगावले. यावेळी राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका केली होती. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांची पहिली भेट नाही. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर आणि पाडवा मेळाव्यानंतर एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्यामध्ये भेट झाली होती. शिंदे, राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची आतापर्यंत सात ते आठ वेळा भेट झाली आहे.

सावरकरांवरील टीका खपवून घेणार नाही उद्धव ठाकरेंचा राहुल गांधी यांना इशारा

■ मालेगाव

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या मालेगावच्या जाहीर सभेत आज उद्धव ठाकरे यांनी आक्रमकपणे भाषण करताना भाजपा आणि शिंदे गटाबरोबरच राहुल गांधींनाही खडेबोल सुनावले आहेत. ते म्हणाले की, आपण देशाचे स्वातंत्र्य आणि संविधान वाचविण्यासाठी एकत्र आलो आहोत. पण त्याचबरोबर सावरकर हे आमचे दैवत आहे. त्यांचा अपमान आम्हाला सहन होणार नाही. आपला जो लढा सुरू आहे त्याला फाटे फुटू देऊ नका, असा इशाराच त्यांनी राहुल गांधींना दिला आहे.

आज मालेगावच्या सभेला प्रचंड गर्दी लोटली होती. या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले की, ज्यांचा स्वातंत्र्य लढ्याशी तिळमात्र संबंध नाही ते

देश गिळायला निघाले आहेत आणि म्हणूनच तुमच्या शक्तीच्या जोरावर मी लढायला निघालो आहे आणि ही लढाई आपल्याला जिंकायचीच आहे. कारण २०२४ मध्ये भाजपा सत्तेत आली तर ही निवडणूक देशासाठी अखेरची ठरेल. तत्पूर्वी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की, येथे कांद्याला भाव नाही असे सांगितले जाते. पण मी म्हणतो कांद्याला भाव आहे. कारण येथे एक कांदा ५० खोक्यांना विकला गेला आहे. येथील एका शेतकऱ्याने मुख्यमंत्र्यांना रक्ताने पत्र लिहिले, पण ते वाचायला मुख्यमंत्र्यांना वेळ नाही. शेतकऱ्यांना केवळ हमीभाव नको तर हमखास भाव हवा आहे. आमचे सरकार असताना आम्ही वेळेवर शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देत होतो. पण आता अवकाळी पावसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे अजून पंचनामे झालेले नाही. पान ७ वर

निकाहत - लवलीनाचा बॉक्सिंगमध्ये गोल्डन पंच

■ नवी दिल्ली

मेरिकॉमच्या नंतर भारतीय महिला बॉक्सरनी पुन्हा एकदा बॉक्सिंगमध्ये जबरदस्त कामगिरी केली आहे. वुमन वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनमध्ये भारतीय महिलांनी ४ सुवर्णपदकांची कमाई केली आहे. भारताच्या स्टार महिला बॉक्सर निकाह जरीन आणि लवलीना बोर्गोहेम यांनी विदेशी बॉक्सरना आस्मान दाखवून सुवर्णपद पटकावले आहे. पान ४ वर

लोकल ट्रेनमध्ये दिव्यांग व्यक्तीला गर्दुल्याकडून जाळण्याचा प्रयत्न

■ ठाणे

लोकल प्रवासादरम्यान दिव्यांग व्यक्तीला गर्दुल्याने जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना शनिवार रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात डाव्या हाताला आणि मानेला गंभीर दुखापत झाल्याने या व्यक्तीला केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. आरोपीचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. प्रमादे वाडेकर असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण या लोकलमधील दिव्यांगांच्या राखीव डब्यातून प्रवास करत होते. प्रवासादरम्यान लोकल कळवा-मुंब्रा स्थानकात येताच एका गर्दुल्याने त्यांच्यासोबत हुज्जत घातली. त्यानंतर नशेसाठी वापरला जाणारा द्रव पदार्थ त्या दिव्यांगाच्या अंगावर फेकून माचिस पेटवून आग लावली. या हल्ल्यात वाडेकरांच्या मानेसह डावा हात होरळपला. त्यांना कळव्याच्या छत्रपती रुग्णालयात नेले असता तिथे उपचाराची सोय नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तिथे त्याला थेट सकाळी ११ च्या सुमारास बेड मिळाला.

मुंबई इंडियन्स चॅम्पियन!

WPL मुंबई- पहिल्या महिला प्रीमिअर लीग स्पर्धेत मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटलचा ७ गडी राखून पराभव केला आणि विजेतेपद पटकावले. मुंबईची एन. स्क्युर आणि कर्णधार हरमनप्रित कौर यांनी चौथ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केल्यामुळे मुंबई इंडियन्सला विजय मिळविता आला. सविस्तर पान ४ वर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची लवकरच धनुष्यबाण यात्रा

■ मुंबई

शिंदे-फडणवीस सरकारच्या विरोधात महाविकास आघाडीने संपूर्ण राज्यभर जाहीर सभा घेण्याची घोषणा केली आहे. त्याला उत्तर देण्यासाठी आता शिंदे गट संपूर्ण महाराष्ट्रात धनुष्यबाण यात्रा काढणार आहे. विशेष म्हणजे ज्या संभाजीनगरातून महाविकास आघाडीच्या सभांना सुरुवात होणार आहे तिथूनच धनुष्यबाण यात्रेला सुरुवात होणार आहे. महाविकास आघाडीच्या सभांना २ एप्रिलपासून छत्रपती संभाजीनगरमधून सुरुवात होणार आहे. महाविकास आघाडीच्या याच सभांना उत्तर देण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मैदानात उतरणार आहे. कारण छत्रपती संभाजीनगरमध्ये महाविकास आघाडीच्या सभेनंतर त्याच मैदानावर ८ किंवा ९ एप्रिलला मुख्यमंत्री शिंदे 'धनुष्यबाण यात्रा' सुरू करणार असून, राज्यभर त्यांच्या सभा होणार आहेत.

कांजुरमार्गमधील म्हाडा कॉलनीच्या इमारतीला आग! ५ महिला गुदमरल्या

■ मुंबई

कांजुरमार्ग परिसरातील (कर्वे नगर) म्हाडा कॉलनी येथील १५ मजली इमारतीच्या चौथ्या मजल्यावर भीषण आग लागल्याने रविवारी सकाळी प्रचंड गोंधळ उडाला. या आगीत श्वास गुदमरल्याने पाच महिलांची तब्येत बिघडली. त्यानंतर त्यांना उपचारासाठी बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. या महिलांची प्रकृती आता स्थिर आहे. कांजूरमार्ग पूर्व येथे कर्वे नगर याठिकाणी असलेल्या म्हाडाच्या १४ मजली इमारतीला शॉर्टसर्किटमुळे आज सकाळी साडेनऊ वाजता

भीषण आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीमुळे धुराचे लोट परिसरात सर्वत्र पसरले होते. धुरामुळे श्वास कोंडल्याने या इमारतीमधील ५ महिलांची तब्येत बिघडली. यानंतर त्यांना तातडीने जवळच्या बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांनी सकाळी १०.१० वाजता आग नियंत्रणात आणली.

...तर मी महाराष्ट्रामध्ये येणे बंद करीन! केसीआरांचे आव्हान

■ नांदेड

बीएसआर पक्षाचे नेते आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर (केसीआर) यांनी नांदेडच्या लोहा येथे आज जाहीर सभा घेतली. या सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना आव्हान देताना के.चंद्रशेखर म्हणाले की, 'तेलंगणा मॉडेल महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी लागू करा आणि दलितबंधू योजना अंमलात आणा, मग माझे महाराष्ट्रात काम राहणार नाही. मी महाराष्ट्रात येणे बंद करीन. त्यांनी जर ही कामे केली नाही तर मी वारंवार महाराष्ट्रात येईन. मी येथे येऊ नये, माझ्या सभेला लोकांनी येऊ नये म्हणून गावागावात लोकांना लांगूलचालन दिले जात आहे. केसीआर पुढे म्हणाले की, मला नांदेडमध्ये दोनदा यावे लागले हे येथील लोकांचे प्रेम आहे. मला नांदेडमध्ये येऊ देऊ नये, यासाठी गावात पाट्या झाल्या. बकरे कापले गेले. माझ्या सभेसाठी लोकांना येऊ दिले जात नाही. खरेदी केंद्र उघडून शेतकऱ्याचे धान्याचा एक एक कण शासनाने खरेदी करावा. या मागण्या जर पूर्ण केल्या तर मी देवेंद्र फडणवीसांना सांगतो की, महाराष्ट्रात येणे बंद करीन.

झेंड्यांचा हिरवा रंग भगवा केला पाहिजे!

वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी धीरेंद्र शास्त्रींवर गुन्हा दाखल

■ उदयपूर

राजस्थानमधील उदयपूर येथील बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. 'झेंड्यांचा हिरवा रंग भगवा केला पाहिजे' अशा भावना भडकवणाऱ्या वक्तव्याप्रकरणी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उदयपूर पोलिसांनी हाथीपोल पोलीस ठाण्यात पंडित धीरेंद्र शास्त्री यांच्या विरोधात कलम १५३-ए अंतर्गत एफआयआर नोंदवला आहे. उदयपूर इथे गुरुवारी झालेल्या एका कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले होते की, 'कुंभलगडमध्ये १०० हिरवे झेंडे आहेत, ते भगव्याने बदलले पाहिजेत. हा भगव्याचा देश आहे, 'हिरव्या'चा नाही.' धीरेंद्र शास्त्री त्यांनी आपल्या भाषणात अनेकवेळा हिंदू राष्ट्राची मागणी केली. यावेळी व्यासपीठावर बागेश्वर धाम सरकार यांच्यासह कथा वाचक देवकीनंदन ठाकूर उपस्थित होते. दरम्यान, कायदेतज्ज्ञांनी या एफआयआरला 'राजकीयदृष्ट्या प्रेरित' असे म्हटले आहे. जबलपूर येथील रहिवासी वकील रश्मी पाठक यांनी सांगितले की, 'एफआयआर नोंदवताना सरकारी यंत्रणेचा वापर करण्यात आला, याचा अर्थ असा होतो की, ते सामान्य नागरिकांनी केले नाही. शास्त्रींच्या भाषणावर कोणाला आक्षेप असेल तर, त्यांनी एफआयआर दाखल करण्याऐवजी निषेध करायला हवा होता.' पाठक यांनी आक्षेप घेतल्यानंतरही शास्त्री यांच्याविरोधात राजस्थानमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला.

छोट्या जाहिराती

संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

पाहिजेत

घरकामासाठी (24 तास) बेबीकेअर / जापाबाई / कुकींगसाठी (बायका / मुली) पाहिजेत. पगार 18,000/- ते 42,000/- 'कुमारसर' **7011456402 / 7718905640** {NC225779}

(मोफत नोकरी) घरकामासाठी, (10/12/24 तास) बेबीकेअर, जापाबाई कुकींगसाठी, (बायका/मुली) पाहिजेत. रंजीतसर' **9321417007 / 9892575886** {NC225598}

घरबसल्या खोबरे, खोबऱ्याचा किस पॅकिंगचे काम हफ्ता १२०००. मो - **9004509250**{NC225893}

डेली १००० पगार कामासाठी स्त्री/पुरुष पाहिजेत. संपर्कः **7738997557** {NC225895}

शिंपोली बोरीवली पश्चिम येथे सोल्डरींगसाठी मुली पाहिजेत. संपर्क - **8291613823** {NC225881}

प्रिंटिंग प्रेसमध्ये फोरकलर हेडलबर्ग मशीनसाठी बॉयलर पाहिजे. मरोळनाका, अंधेरी (पूर्व), **9821730966** {NC225901}

सिक्युरिटीगार्ड / सुपरवायझर / भर्ती 8/12 तास पगार 18000- 24000 राहणे खाणे फ्री **9892942803** {NC225913}

कवच सिक्युरिटी : अंधेरी, माहीम, वरळी, डोंगरी, आग्रीपाडा गार्ड पाहिजेत. 12 तास. चांगला पगार. **9821297896 - 9870002587** {NC225906}

बॅग थ्रेड कटिंग आणि चेकिंगसाठी हेल्पर (वय ३५ पर्यंत), सायन स्टेशनजवळ बॅग मॅन्युफॅक्चरिंग कंपनीसाठी पाहिजेत. संपर्क : प्रविणा **9930754623 / 9768033686** {NC225899}

नेक्सपार कंपनीकरीता महिला/ पुरुष पॅकिंग स्टाफ व सुपरवायझर पाहिजे, वय, शिक्षण, अनुभवाची अटी नाही. पगार 18000/- ते 22000/- संपर्क : **7738137225 / 8879785786** {NC225908}

8/12/24 तास घरकाम बेबीकेअर/ पेशंटकेअर / कुकिंगसाठी त्वरीत मुले / मुली / महिला पाहिजेत. **8291205960** {NC225925}

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरीत मुले पाहिजे. ठिकाण - घाटकोपर, मुलुंड, लोअर परेल, फोर्ट, दादर, वडाळा, नवी मुंबई. दररोज रोख 500 + बस पास. Speedman Express 191-B, 9th Cavel, Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School, Chirabazar, Mumbai - 400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC225355}

मालाडमध्ये CCTVसाठी इलेक्ट्रीकल हेल्पर पाहिजेत. ELECTRONICS INDIA **9322594195, 9930540545** {NC225918}

19x25 पंचिंग मशीन चालवण्यासाठी ऑपरेटर पाहिजे मालाड (पूर्व) संपर्क:- **9137340779 / 7900015189** {NC225952}

आश्रमात कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 6000 - 8000. मीरारोड / ऐरोली / केळवे रोड - **8779694066** {NC225574}

कांदिवली, दहिसर, मिरारोड, वाडासाठी सिक्योरिटी गार्डस् आणि सुपरवाइझर पाहिजेत. आकर्षक वेतन. त्वरित संपर्क : **9768785795** {NC225840}

फार्मासिटिकल कंपनीसाठी मुले/मुली पाहिजे शिक्षण दहावी पगार 10000/- ते 12000/- बस सुविधा मुलुंड **9321516536** {NC225892}

आयुर्वेदिक कंपनीला डोअर टू डोअर मार्केटिंग, कँप मार्केटिंग डाटा कॉलिंगचा अनुभव असलेले मुले मुली महिला पाहिजेत. राहण्याची व्यवस्था केली जाईल. **9702974590** {NC225948}

CNC Turning, VMC Surface Grinding मशीन ऑपरेटर पाहिजेत. A82/1, अंबरनाथ, MIDC **9820572029** {NC225865}

फार्मा डीस्ट्रीब्युटरला पॅकिंग कामासाठी मुली आणि डिलिव्हरीकरिता मुले पाहिजेत. **7021250928** {NC225875}

लेडीज ब्युटी पार्लरसाठी ब्युटिशियन, हेअर ड्रेसर, नेल आर्टिस्ट, pedicurist पाहिजे. **9819029745** {NC225862}

अनुभवी स्क्रीन प्रिंटर पाहिजेत. संपर्क ८/७ बाराचाळ, एस. जे. मार्ग, लोअर परेल (W), मुंबई - 13. **9820970898** अजय {NC221446}

बँकेच्या कामाकरिता दादर पूर्व येथे टेलिकालिंगसाठी मुली/महिला पाहिजेत. (फिक्स Salary) **7039116408**{NCC221448}

विरार येथे कायम रहाणारी स्वयंपाकीण पाहिजे. पगार 6,000/-. मो. **9273323444.** {NC225947}

पाहिजेत

ALERT सिक्युरिटी सुपरवायझर, गार्ड, हाऊसकिपिंग मुले पाहिजे. 8/12 तास, अंधेरी, कांदिवली, चर्नीरोड, दादर पश्चिम **9619115448 / 8422880514** {NC225935}

स्क्रीनप्रिंटर/ स्टॉपरमॅन आणि पॉवरप्रेस व हॅन्डप्रेस ऑपरेटर आणि डिलिव्हरी व पॅकिंगसाठी मुले/ मुली पाहिजेत. जयगणेश- गाला नंबर- 6 - बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर- 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105/ 9137518551** {NC225946}

जाहिरात एजन्सी
नवाकाळ लोकसत्ता मटा
जीवनसाथी,प्रॉपर्टी,Notice
सर्व पेपरच्या जाहिराती
फोन करताच छापतो!
8976181891
TimeAd-Helpline
022-24468556

वडाळायेथे असेंब्ली सोल्डरिंग टेस्टिंगसाठी ITI/DIPLOMA/ MCVC (Electronics) मुले, मुली पाहिजेत. डिप्लोमा इंजिनिअरला प्राधान्य. Ph: **7738378495** ईमेल oes.hrd@gmail.com {NC225940}

घाटकोपरयेथे प्रा. ली. कंपनीकरिता ऑफिस बॉईज (फिल्ड वर्क) पाहिजेत. वय 30 खाली, पगार + ट्रॅव्हलींग + बोनस पत्ताः राह लीगल नॉलेज प्रोसेस प्रा. ली. 201, ऐ, रहेजा प्लाझा, 1 एलबीएस मार्ग, दर्गासमोर, घाटकोपर वेस्ट, मुंबई - 400086. फोन : **022-22696622 / 9869081938** {NC225943}

घरकामासाठी 8/10/12/24 तासासाठी बायका-मुली, बेबीकेअर, पेशंटकेअर कुक्स पाहिजेत. पगार 10,000/- ते 20,000/- राहणे-खाने फ्री. **9082506144 / 8891081138** {NC225945}

उबेरसाठी ड्रायव्हर पाहिजेत, कमवा ₹ 25000 + महिना, कॉल करा. एव्हरेस्ट फ्लीट : **9736003003** {NC225864}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भरती. 15000/- ते 35,000/- **8976152977** {NC225772}

लोअरपरेल, पगार 12500 सुट्टी नाही काम 9 ते 6 (वेळेवर पगार, ॲडव्हान्स, गाडीभाडे, ओव्हरटाईम) बिल्डिंगच्या मशीनने टाकी साफसफाईसाठी कामगार पाहिजेत. **8080853535** {NC225845}

गोरेगाव (पूर्व) येथे पॅकींग व फिटिंगसाठी मुली त्वरित पाहिजेत. शिक्षण आठवी ते दहावी भेटा- २-५ पगार ८५००-९००० संपर्क. 7710902472/ 02240123976 {NC225896}

आयुर्वेदीक कंपनीत मेगा भरती 10वी- ग्रॅज्युएट. पगार- 10,000 - 12,000/- .भांडुप : **9967525416 / 9220781964.** {NC225689}

राममंदिर (पश्चिम) स्टेशन जवळ कॉम्प्युटर एम्ब्रॉयडरी फॅक्टरीत अकाऊंटंट, कारीगर, धागाकटींग साठी स्टाफ पाहिजे. **9820738139** {NC225738}

फ्री जॉब ! सुमित सेफ सिक्युरीटी प्रायव्हेट लिमिटेड. गार्ड, सुपरवायझर ताबडतोब पाहिजेत. राहण्याची सोय. (ऑफिस - **022-25901664 / 25681122 / 25681133**), (मुलुंड- **9769037229 / 9930064005/ 9223290004 / 8454050895**), (ठाणे- **8928598919**), (डोंबिवली- **9372264341**), (वेस्टर्न- **8169290790 / 9769758542**), (पुणे- **9930064008 / 9223290222**) {NC225720}

पाहिजेत अंधेरीमध्ये 10वी पास मुले/मुली, वय 23 ते 40, सिक्युरिटीगार्ड, ड्युटी 8 तास, पगार 22 ते 25 हजार **8454079861 / 7304724912** {NC225869}

जॉब-जॉब कालबादेवीमध्ये रेडिमेड गारमेंट एसी शोरुमसाठी 2/3 महिना करिता कॉलेज स्टुडंट मुले पाहिजे (कामाची वेळ : 10 ते 10)'' संपर्क - **9819155563 / 9930756612** {NC225911}

पिनकोड 4, 6, 8, 10, 14, 18, 19, 26, 27, 36, 66, 68, 91, 92, 101. 103, 105, 107 साठी स्वतःची मोटरसायकल असलेले/ नसलेले डिलिव्हरीबॉईज पाहिजेत. पगार 12,000/- + कन्वेअन्स + इन्सेंटिव. **8999934778** {NC225856}

मॉलमध्ये मुले/ मुली पाहिजेत. 12,000-15,000 **(8433683085)** वय 18-30. {NC225600}

पाहिजे पेस्ट कंट्रोल ऑपरेटर Rs. 18000/- हेल्पर्स, डिलिव्हरी बॉईज, सुपरवायजर हॅण्डबिल वाटणारा, वॉटर टँक, कार, सोफा क्लिनर रोजंदारी किंवा मासिक पगारावर वि बॉस इंडिया बि/101, विन्सवे अपार्टमेंट, पहिला मजला, तेलीगल्ली, पिंपळेश्वर मंदिराजवळ, अंधेरी (पूर्व), प्लेसमेंट नाही. {NC225966}

पाहिजेत

घरकामासाठी महिला मुली, मुले, जोडपे, नर्स, कुक, जापामेड पेशंटकेअर हॉटेल स्टाफ जोडपे राहणे खाण्याची सोय पगार + बोनस + ट्रेनिंग १०००० ते ४०००० पगार - **8976034958 / 8976034959** {NC225777}

गार्ड / सुपरवाईजर/ हाऊसकिपिंग / हाऊसकिपिंग सुपरवाईजर / ड्रायव्हर पाहिजे. मो. - **7666400700** {NCC221441}

दादर (पश्चिम) येथे अनुभवी - निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य तपशिलासह भेटा : माहेर हॉल, पोर्तुगीज चर्चसमोर संपर्क : **9987712677** {NC225907}

बॅक ऑफिस बँकिंगसाठी लेडीज जेन्टस पाहिजेत. अंधेरी ईस्ट संपर्क - **9892193095** {NC225928}

अर्जंट ज्वायनिंग सिक्युरिटी, पॅकिंग, पेशंटकेअर, ऑफिस बॉय, ड्रायव्हर मानवी - **9970445194** {NC225934}

ठाणेस्थित वयस्कर, एकाकी ब्राह्मण व्यक्तिला घरातील कामे आणि बाहेरील कामे करणारी सुशिक्षित मुलगी पाहिजे. संपर्क : **9820810715** {NC225909}

बोरीवलीत नामांकित संस्थेला फिमेल टेलीकॉलर पाहिजेत. बिनअनुभवी चालेल, त्वरीत ज्वायनिंग, लिमिटेड सीटस उपलब्ध. **9767165759 / 8828524469** {NC225954}

कुरियरसाठी फोर्ट, चर्चगेट, नरीमन पॉईंट, कुलाबा, काळबादेवी, मस्जिद, गिरगाव, डिलिव्हरी बॉईज आणि कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. Daily Payment FORT. **9152665360** {NC225957}

मुंबईची कंपनीमध्ये अनुभवी इलेक्ट्रिकल टेक्निशन पाहिजेत लाईट बसवणेसाठी **7045976442** {NC225958}

डीटीपी ऑपरेटर पाहिजे (सीडीआर आणि एआई) फ्रेशर किंवा अनुभवी. अंधेरी (पूर्व) **8169268661** {NC225962}

काळबादेवी कंपनीमध्ये ऑफिस बॉय मुले पाहिजेत आणि लोडींग काम **9920480316.** {NC225963}

कुरियर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. एशियानेट लॉजिस्टिक बी/5, शुभम सेंटर नं. 1, कार्डियल ग्रेसियस रोड, चकाला, अंधेरी (ईस्ट), **9702845088 / 8655034052** {NC225964}

Situation Vacant

Required 4-5 Helpers for Packing Loading In Tempo. Salary 10,000/-. 1 Flexo Printing Operator with 4 Colour Machine min 3-4 years experienced. Salary depends on experience. Timing 9.00 - 7.30. Bhandup West. **8657429942 / 9820299825.** {NC225969}

पाहिजेत

नामांकित पॅकेजिंग आणि प्रिंटींग प्रेस मध्ये
कोमोरी GL-640-6 Col
युवी कोटरसाठी प्रिंटर, फिडरमन, बॉलर, सुबा विन्डो पेस्टिंग, लॅमिनेशन, नोवाकट पंचिंग, पेट शिटिंगसाठी ऑपरेटर, बाईंडर, सॉरटिंग टीम, बॉक्स पेस्टिंग मशिन टीम, हेल्पर, ऑफिस असिस्टंट, हाऊस कीपिंग व इतर कामांसाठी उमेदवार पाहिजेत.
फॅक्टरी:
पोमण गांव, कामण, वसई (पूर्व).
8879680454
8007808838
बोरीवली ते विरार व भिवंडी येथे राहणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य

Situation Vacant

Wanted Security Guards/ Supervisor for working in Ulwe area. Contact No. **9769733808 / 9920265246.** {NC225915}

शैक्षणिक

मेकॅनिकल/ सिव्हील/ आर्किटेक्चरल, CAD-CAM-CNC, MS-CIT, Tally, Excel, इलेक्ट्रिशियन, ऑटोमोबाईल, मोबाईल रिपेअरिंग, इंडस्ट्रीयल इन्स्टिट्यूट, ठाणे (पश्चिम) **9619535383, 8928677130, 9920249649** {NC225202}

Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, MBA, DIPLOMA **9168088740** {NC225876}

व्यवसाय विषयक

छोट्या इंवेस्टमेंटमध्ये पार्ट/ फुल टाईम काम करून महिना लाखो रुपये कमवण्याची संधी. संपर्क - **9324889875** {NC225931}

स्वतःचा व्यवसाय सुरू करून दिवसा 2000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434** ठाणे - **8169296768** {NC225752}

सामान्य माणसाला उद्योगात आणण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न! संपर्क - **9867797383** {NC225904

व्यसनमुक्ती

दारू, तंबाखु, सिगारेट सोडवा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यसनमुक्ती केंद्र - (दादर) **7738770405** {NC225775}

वाचकांना सूचना
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
-मॅनेजर, 'नवाकाळ'

राशीभविष्य

सोमवार, दि. २७ मार्च २०२३
संजय मनोहर

मेष तरुणांच्या कार्यकर्तृत्वास वाव मिळेल. स्त्रीविषयक अडचणीचे प्रश्न मार्गी लागतील. सहकारी, शेजाऱ्यांशी वादविवाद टाळावेत.

वृषभ भागीदारीच्या व्यवहारात भान ठेवून निर्णय द्यावे घ्यावेत. तुमच्या कल्पना यश देतील. संततीच्या कामातील अडथळे दूर होतील.

मिथुन महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याच्या प्रयत्नांना दिशा मिळेल. कौटुंबिक सुख वाढविणाऱ्या गोष्टींची खरेदी कराल. जोडधंद्यातून चांगला फायदा संभवतो.

कर्क काही उत्साह वाढविणाऱ्या बातम्या समजतील. घरातील जुन्या पिढीकडून फायदा संभवतो. शासकीय कामातील अडथळे दूर होतील.

सिंह सकारात्मक दृष्टिकोन त्रास कमी करेल. व्यवसायात एकंदरीत उत्साह वाढविणाऱ्या बातम्या समजतील. वाहने भान ठेवून चालवावीत.

कन्या नोकरीत वरिष्ठांशी वादविवाद वाढवू नयेत. घरातील जुन्या पिढीशी थोडे मुत्सद्दीपणाने वागावे लागेल. जवळील प्रवास आनंद देतील.

तूळ नोकरीच्या शोधार्थींना यश मिळेल. इतरांशी बरोबरी करणे टाळावे. मित्रांच्या सहवासात भटकंती, करमणुकीचा आनंद घ्याल.

वृश्चिक अडचणी मुत्सद्दीपणाने सोडवू शकाल. परिणामांचा विचार समोर ठेवूनच आश्वासन द्यावी घ्यावीत. नोकरीतील अडचणी दूर होतील.

धनु तुमची मनोरथे प्रयत्नांती पूर्ण होतील. वडिलोपार्जित मालमत्तेसंबंधी काही लाभ दृष्टिपथात येतील. सत्संगाचा लाभ होईल.

मकर निर्णय घेताना घरातील ज्येष्ठांचा सल्ला फायद्याचा ठरेल. खर्च वाढणार नाही याची दक्षता घ्या. प्रकृतीबाबत करू बघू अशा गोष्टी अडचणीच्या ठरतील.

कुंभ घरात एकवाक्यता निर्माण होऊ शकते. नोकरीत हाताखालील व्यक्तींचे उत्तम सहकार्य मिळेल. व्यवसायात कर्ज, भांडवलाची अडलेली कामे मार्गी लागतील.

मीन हितशत्रू डोके वर काढतील. घरात खेळीमेळीचे वातावरण राहील. जप, तप, अनुष्ठानाचे संकल्प पूर्णत्वास जातील.

अलकनंदा खोऱ्यातील मंडल गावात 'चिपको' आंदोलन

उत्तर प्रदेशच्या अलकनंदा खोऱ्यातील मंडल गावात 'चिपको' आंदोलनाची सुरुवात झाली. झाडे वाचवण्यासाठी केलेल्या चिपको आंदोलनाला ४९ वर्ष पूर्ण झाली. २६ मार्च १९७३ रोजी या आंदोलनाला सुरुवात झाली.

संजीव वेलणकर
पुणे

अलकनंदा खोऱ्यातील जंगलाचा एक भूभाग क्रीडा साहित्य तयार करणाऱ्या एका कंपनीला देण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यातून आंदोलन उभे राहिले. 'दाशौली ग्राम स्वराज्य संघ' या स्थानिक संस्थेने शेतीची अवजारे तयार करण्यासाठी राज्य सरकारकडे याच जंगलात वृक्षतोड करण्याची परवानगी मागितली होती; ती नाकारली गेली होती. त्यामुळे साहजिकच व्यापारी कंपनीला दिलेल्या परवानगीला लोकांनी विरोध केला. त्यातून 'चिपको' आंदोलन उभे राहिले. त्यात गौरादेवी, सुदेशादेवी, बचनीदेवी यांसारख्या स्त्रिया हिरिरीने उतरल्या. गौरादेवीने गावागावांत फिरून स्त्रियांना एकत्र आणले आणि जंगलात चिपको आंदोलन सुरू केले.

जंगलात तब्बल अडीच हजार झाडांचा लिलाव त्यावेळी करण्यात आला. गावातील आंदोलकांनी विरोध केला, तरीही लिलाव झालाच. ठेकेदारांना लोकांच्या विरोधाची कल्पना होती. त्यांनी कार्यकर्त्यांना लोकांची जुनी देणी देण्याच्या निमित्ताने चामोलीत बोलावून घेतले. त्यांच्या गाफीलपणाचा गैरफायदा घेऊन त्यांनी गुपचूप रेनीच्या जंगलात मजूर पाठविले. एका छोट्या मुलाने झाडांची कत्तल करण्यासाठी आलेल्या मजुरांना पाहिलं आणि धावत गावात ही खबर दिली. पण, गावात फक्त १५-२० स्त्रिया आणि काही छोटी मुले होती. पुरुष मंडळींना निरोप कळवून ते परत येईपर्यंत दोन-तीन दिवस लागणार. तोपर्यंत जंगलतोड अटळ होती. हे लक्षात येताच गावातील महिला आपल्या मुलांसह जंगलात आल्या. बायकांसह सगळी लहान मुलं झाडाला चिकटून उभी राहिली. ठेकेदारांनी स्त्रियांना विवस्त्र करण्याच्या धमक्या दिल्या. पण, एकीनीही ठेकेदारांच्या धमक्यांना भीक घातली नाही. शेवटी मजूरांनी माघार घेतली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी भारतात झालेलं हे पहिलंच अनोखं आंदोलन होतं. पुढे हे आंदोलन 'चिपको' आंदोलन म्हणून ओळखलं जाऊ लागलं. याची दखल तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना घ्यावी लागली होती.

पुण्याच्या वानवडीत वाहनांची तोडफोड

■ पुणे

पुण्यातील वानवडी गावठाण परिसरात शनिवार मध्यरात्री अज्ञात व्यक्तींकडून वाहनांची तोडफोड केली. वानवडी गावात परिमंडळ झोन ५ चे पोलीस उपआयुक्तालय कार्यालय असून, त्यांच्या शंभर मीटरवरही घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. तीन महिन्यात दुसऱ्यांदा हा प्रकार घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाहनांची तोडफोड झालेल्या ठिकाणी पोलिसांनी पाहणी केली आहे, त्या परिसरातील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सर्व घटना कैद झाली आहे. वानवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब पटारे यांनी सांगितले की, या घटनेमागे ४ ते ५ व्यक्तींचा हात असल्याची शक्यता आहे.

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:15 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 26/03/2023

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- : **MO-02 : 5858** — चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/-				
3133	4085 (चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक (5 बक्षिसे))	4281 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई (5 बक्षिसे))	4478 (जय जलाराम लॉटरीज्, गोरेगाव (5 बक्षिसे))	5642 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली (5 बक्षिसे))

तिसरे बक्षिस रु. 1000/-	चौथे बक्षिस रु. 500/-	पाचवे बक्षिस रु. 400/-
1590	1117	1089
1951	1192	1355
1958	1250	1361
2019	1930	2000
2041	2016	2010
2408	2660	2031
2711	3042	2256
2878	3941	2393
3603	4136	2614
4133	4332	4826
4228	4723	4949
4331	5189	5086
4659	5481	5181
5603	5598	5606
5721	5672	5804

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 26/03/2023

पहिले बक्षिस रु. 10000/- : **MG-06 : 8267**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 8822 — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे (5 बक्षिसे)

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 1784, 5021 — हरी श्री लॉटरी सेंटर - नालासोपारा (5 बक्षिसे)

चौथे बक्षिस रु. 1000/- : 1239, 7607 — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (5 बक्षिसे)

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

पाचवे बक्षिस रु. 500/-			सहावे बक्षिस रु. 200/-			सातवे बक्षिस रु. 100/-		
1019	2679	6146	1119	4010	6489	1642	3937	6463
1022	3690	6159	1501	4320	6606	1785	4349	6612
1087	3942	6412	1601	4343	6699	1901	4444	6755
1148	4455	6484	1647	4541	7013	2219	4459	6768
1319	4467	6617	1913	5136	7049	2637	5089	6792
1411	4510	7414	2062	5205	7331	2748	5366	6961
1702	4795	7599	2393	5358	7376	2922	5383	7390
1776	5100	7797	2473	5415	7436	2992	5430	7564
1821	5188	8011	2924	5565	7604	3003	5482	7705
1949	5542	8692	3232	5678	8258	3033	5666	8067
2129	5717	8884	3390	5905	8734	3140	6384	8414
2260	5928	8891	3514	5939	8778	3317	6393	8417
2263	6096	8948	3620	6073	8881	3505	6396	8466

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

शुभ राशी दि. २७/०३/२०२३

७	९	६
७०	९०	६०
७५	९५	६५
१२४	१२८	१५०
३६८	३८०	२४०

एप्रिलमध्ये १५ दिवस बँका बंद

■ नवी दिल्ली

एप्रिलमध्ये बँका १५ दिवस बंद राहणार आहेत. एप्रिल महिन्यात शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांसह महावीर जयंती, गुड फ्रायडे आणि आंबेडकर जयंती आदी सणांमुळे एकूण १५ दिवस बँका बंद राहणार आहेत. बँकेच्या सुट्ट्यांमुळे ग्राहकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग यासारख्या ऑनलाइन सुविधा सुटीच्या दिवशीही सुरू राहणार आहेत.

पुढील दिवशी बँका बंद राहतील -

१ एप्रिल : वार्षिक ताळेबंदासाठी बँका बंद,२ एप्रिल : रविवार, ४ एप्रिल : महावीर जयंती, ५ एप्रिल : बाबू जगजीवन राम यांची जयंती (सुटीचे ठिकाण हैदराबाद), ७ : गुड फ्रायडे, ८ एप्रिल : दुसरा शनिवार, ९ एप्रिल : रविवार, १४ एप्रिल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १५ एप्रिल : हिमाचल दिवस / बंगाली नवीन वर्ष, १६ एप्रिल : रविवार, १८ एप्रिल : शब ए कद्र - जम्मू - काश्मीर, २१ एप्रिल : ईद उद फित्र, २२ एप्रिल : ईद आणि चौथा शनिवार, २३ एप्रिल : रविवार, ३० एप्रिल : रविवार.

शुभारंभाचे प्रयोग !
online tickets- bookmyshow
शुक्र ७ एप्रिल दु.४ श्री शिवाजी मंदिर,दादर
शनि ८ रात्रौ ८.३० सावित्रीबाई फुले,डोंबिवली
रवि ९ दु.४.३० कालिदास नाट्य मंदिर,मुलुंड
रवि १६ दु.४ प्रबोधनकार ठाकरे,बोरिवली



महेश वामन मांजरेकर सादर करीत आहे
करून गेलो गाव
लेखक / दिग्दर्शक राजेश देशपांडे निर्माते राहुल भंडारे आणि महेश वा.मांजरेकर
ओंकार भोजने आणि भाऊ कदम
सूत्रधार सुनील पानकर ९४०४७३१४७३

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 13 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 26/03/2023

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-00 : 6946**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 1497, 2788, 6716, 9116

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 0566, 1647, 4261, 5233, 5861, 6058, 6095, 6735, 6881, 8277 — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (5 बक्षिसे)

चौथे बक्षिस रु. 1000/-									
0922	1293	3684	5025	5649	6709	7471	8374	8570	9898

पाचवे बक्षिस रु. 500/-									
0175	0799	3230	4445	4884	4906	6358	6575	7639	8808

सहावे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

सहावे बक्षिस रु. 200/-										
	0989	1789	2648	3738	4724	5663	6620	7317	8111	8986
	1009	1941	2660	3765	4754	5829	6636	7338	8114	9010
	1015	2015	2825	3773	4814	5996	6678	7366	8135	9028
0036	1027	2055	2845	4030	4842	6036	6684	7384	8164	9110
0086	1042	2126	2861	4042	4850	6076	6696	7437	8177	9154
0170	1125	2176	2892	4164	4907	6086	6703	7471	8268	9184
0189	1172	2196	2944	4183	4932	6089	6738	7501	8282	9196
0245	1188	2201	3034	4233	5025	6124	6740	7653	8322	9290
0254	1191	2211	3053	4249	5092	6220	6848	7723	8349	9339
0300	1241	2246	3063	4268	5105	6233	6861	7737	8378	9671
0317	1279	2272	3141	4308	5116	6269	6868	7755	8385	9695
0338	1310	2280	3230	4339	5248	6362	6890	7772	8518	9699
0376	1322	2297	3262	4355	5345	6388	6903	7779	8573	9840
0412	1361	2334	3303	4394	5355	6403	6990	7790	8737	9854
0484	1416	2335	3327	4424	5451	6476	6995	7811	8742	9865
0542	1473	2384	3333	4450	5508	6510	7051	7952	8838	9876
0578	1481	2447	3370	4484	5517	6519	7062	7971	8864	9901
0676	1561	2451	3463	4491	5522	6526	7089	7972	8889	9947
0708	1570	2511	3496	4505	5525	6529	7101	7976	8898	9970
0803	1610	2535	3507	4538	5528	6542	7129	8064	8940	9975
0806	1733	2550	3509	4600	5531	6556	7234	8085	8941	9986
0807	1768	2632	3550	4664	5554	6565	7255	8098	8948	9993
0820	1772	2640	3645	4674	5568	6566	7263	8105	8981	9998

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

राजश्री लॉटरी
Government Lottery
Govt of Mizoram Govt of Goa
फक्त 28 दिवसात
1,26,623
विजेत्यांनी जिंकले
₹3,00,28,480
तुम्ही पण खेळा आणि जिंका!
राजश्री 1000
तुम्हालाही विजेता व्हायला आवडेल का
पहिले बक्षीस ₹1.25 करोड
आमचे पुढील विजेता?
ड्रॉ दर चौथा मंगळवार सायं 6.30 वाजता
ड्रॉ दिनांक: 28.03.2023
तिकीट ₹1000
तिकीट सर्व जवळच्या लॉटरी आउटलेट वर उपलब्ध
Book Now At: bookmyrajshree.com
Call Now : 022 6835 1535

राजश्री सुरभी Government Lottery
राजश्री एव्हरेस्ट Government Lottery
व्हा लखपति फक्त ₹10 मध्ये
नवीन ड्रॉ
पहिले बक्षीस ₹ 5 लाख
(₹10,000 x 50 बक्षीस)
ड्रॉ दर रोज सायंकाळी 07:30
ड्रॉ दर रोज दुपारी 03:30
तिकीट सर्व जवळच्या लॉटरी आउटलेट वर उपलब्ध
Book Now At: bookmyrajshree.com
Call Now : 022 6835 1535

बरेच गाजलेले आणि वाजलेले हे अधिवेशन...

२७ फेब्रुवारी रोजी प्रारंभ झालेल्या राज्य विधिमंडळाच्या मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे शनिवारी २५ मार्च रोजी सूप वाजले. भाजपचे राहुल नार्वेकर विधानसभा अध्यक्ष झाल्यानंतर हे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन होते. हे अधिवेशन बरेच गाजले आणि वाजलेही. अनेक नियमबाह्य गोष्टी या अधिवेशनात पाहायला मिळाल्या. तसेच विधिमंडळाच्या सहा दशकाच्या प्रथा, परंपराही मोडीत निघाल्याचे या अधिवेशनात ठळकपणे दिसले.

अधिवेशन म्हटले की सभात्याग, गोंधळ, बहिष्कार, वेलमध्ये जाऊन घोषणा देणे हे ओघाने आलेच. आश्चर्य म्हणजे या अधिवेशनात विरोधकांनी एकही दिवस कामकाज बंद पाडले नाही. सभागृहात गोंधळ घातला नाही. उलट सत्ताधाऱ्यांनी गोंधळ घातला. कामकाज बंद पाडले आणि आंदोलने सुद्धा केली. सभागृह चालवण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची असते, पण हा नियम या अधिवेशनात मोडीत निघाल्याचे दिसले.

विरोधकांनी आपल्या मागण्यांसाठी जरूर आग्रह धरला. त्यासाठी त्यांनी मूक आंदोलन केले. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर धरणे धरले. काळी फीत लावून कामकाजात भाग घेतला, पण सभागृहात व्यत्यय आणला नाही.

या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, लक्षवेधींचा पाऊस. एका एका दिवशी वीस-वीस लक्षवेधी कार्यक्रम पत्रिकेत होत्या. प्रत्यक्षात केवळ १४५ लक्षवेधींवर चर्चा झाली. या लक्षवेधीमुळे सभागृह सकाळी नऊ वाजता सुरू व्हायचे ते रात्री अकरा वाजेपर्यंत चालायचे. ब्रिफिंग घ्यायला मंत्र्यांना वेळ नसायचा. अधिकारी माहिती देऊन, देऊन थकले.

परिणामी, वैतागून मंत्र्यांनी सकाळच्या विशेष बैठकीला येणे सोडून दिले. रात्री दोन वाजता आम्ही ब्रीफिंग घ्यायची काय? हा काय प्रकार आहे, असे मंत्री तावातावाने म्हणत होते. त्यामुळे लक्षवेधीला उत्तर द्यायला मंत्री नसायचे. लक्षवेधी बारगळायच्या. मंत्री सभागृहात नाहीत म्हणून सभागृह किती वेळा तहकूब करणार? शेवटी विरोधकच म्हणाले, मंत्री नसले तरीसुद्धा सभागृह चालवा.

प्रश्नोत्तराचे तसेच झाले. सात ते आठ प्रश्न, एका तासात झाले तर त्या सभागृहाचे कामकाज उत्तम असे म्हटले जाते. या अधिवेशनात ७ हजार ९८१ तारांकित प्रश्न पाठवले होते. त्यातल्या केवळ ५५ प्रश्नांवर या अधिवेशनात चर्चा झाली. दररोज केवळ दोन ते तीन प्रश्नांवरच चर्चा व्हायची. उत्तमरित्या सभागृह चालवण्याचे हे काही लक्षण नाही.

या अधिवेशनात १७ विधेयके मांडण्यात आली आणि सर्व विधेयके मंजूर झाली. वाईट गोष्ट अशी की, विधेयकावर चर्चाच होत नव्हती. मग या सभागृहाला कायदेमंडळ कसे म्हणायचे? चर्चा होऊन विधेयके पारित व्हायला हवी, पण हा संकेतही या अधिवेशनात मोडल्याचे दिसून आले.

अधिवेशन काळात राज्यात अतिवृष्टी आणि गारपीट झाली. एक लाख ३९ हजार हेक्टरवरली पिके नष्ट झाली. काही भरपाई मिळेल, त्याची घोषणा होईल अशी राज्यातल्या बळीराजाला अपेक्षा होती. पण कर्मचारी संपाचे कारण पुढे करत पंचनामे झालेले नाहीत, अशी सबब दाखवत सरकारने अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईची घोषणा काही केली नाही. त्यामुळे या अधिवेशनातून काय निष्पन्न झाले? असा प्रश्न विचारला जात आहे.

कॅग रिपोर्ट मांडण्यात आला. सरकारने केवळ अहवाल सादर करायचा असतो. आश्चर्य म्हणजे कॅग रिपोर्टवर पहिल्यांदाच अधिवेशनात चर्चा झाली. सत्ताधारी पक्षांनी त्यातल्या अनेक बाबींवर प्रश्न विचारले आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर उत्तरे दिली. आता हे विचारू नका, त्यामध्ये काय होते? तर तो अहवाल होता, मुंबई महापालिकेच्या कारभारासंदर्भात. गेली तीन दशके या महापालिकेवर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची सत्ता होती. मागच्या अधिवेशनात या सरकारने मुंबई महापालिकेची चौकशी केली जाईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार हा अहवाल आला, तो मांडण्यात आला.

हे अधिवेशन दालनात बैठका घेण्यासाठी होते की काय? असा प्रश्न अनेकांना पडला. एखाद्या प्रश्नावर, एखाद्या लक्षवेधीवर उत्तर घेण्याऐवजी दालनात बैठक घेतली जाईल आणि तुम्हाला बोलावले जाईल, असे मंत्री सांगायचे. मंत्रीच नव्हे तर पिठासन अधिकारी असे निर्देश देत. आमदार तशी मागणी करायचे. मग, अनेकांना प्रश्न पडला की, अधिवेशन घेता कशाला? बैठका घेऊनच समस्या सोडवा.

बेशिस्तपणा हा या अधिवेशनाने दाखवलेला आणखी एक गुण. उपमुख्यमंत्र्यांच्या आसनावर आमदार बसायचे. उपसभापतींच्या जागेवर पाचव्या रांगेतले आमदार येऊन बसायचे. सत्ताधारी बाजूच्या पहिल्या दोन रांगा मंत्र्यांसाठी राखीव असतात. मात्र आमदार त्या पहिल्या दोन रांगेत बसलेले दिसले. शेवटी वैतागून विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सर्वांना झापले. इतके बेशिस्तपणाचे चित्र यापूर्वी दिसलेले नव्हते.

अधिवेशनात राज्याच्या समस्या सोडवायच्या असतात. सामान्य माणसाला दिलासा द्यायचा असतो. कायदे करायचे असतात, त्यावर चर्चा करायची असते, पण हे अधिवेशन गाजले इतरच कारणांनी. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वि. दा. सावरकर यांच्यावर केलेली टिप्पणी तसेच त्यांना झालेली खासदारकी रद्दची शिक्षा. तसेच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेली ट्विट आणि त्यांच्यावरील हक्कभंगाचे प्रकरण यामुळे. या गोंधळात कामकाज वाहून गेले, असे खेदाने म्हणावे लागते.

आम्हाला बोलू दिले जात नाही, सरकार सूडबुद्धीने वागते आहे, असा आरोप विरोधी बाजूच्या अनेक आमदारांनी केला. विधानसभा अध्यक्ष हे एका राजकीय पक्षाचे नसतात. त्यांनी विरोधकांना संरक्षण द्यायचे असते, पण असे सभागृहात यावेळी काही दिसले नाही.

या अधिवेशनात ४ तास ५१ मिनिटे इतका वेळ वाया गेला. आमदारांची उपस्थिती सरासरी ८० टक्के इतकीच होती. विरोधक म्हणाले, हे अधिवेशन बेफिकिरी आणि बेशिस्तीचा कळस होता. सत्ताधारी म्हणाले, या अधिवेशनाने अधिक कामकाज करण्याचा विक्रम केला. आता कोणते सत्य आहे, हे तुम्हीच निवडा.

नेहा पुरव

मिसिसिपीला चक्रीवादळचा तडाखा! २६ मृत्यू

■ न्यूयॉर्क

अमेरिकेच्या दक्षिण-पूर्वेकडील मिसिसिपी राज्याला शुक्रवारी मध्यरात्री चक्रीवादळ धडकल्याने मोठा तडाखा बसला. या चक्रीवादळामुळे आतापर्यंत २६ जणांचा मृत्यू झाला. सुमारे १ तास हे चक्रीवादळ मिसिसिपी येथील जमिनीवर घोंगावले. चक्रीवादळ धडकल्यानंतर मुसळधार पावसात चेंडूएवढ्या गारा पडल्याने तेथील लोक भयभीत झाले होते. तेथील वीजपुरवठा खंडित झाला. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी अधिकाऱ्यांशी बोलून लवकरात लवकर मदत देण्याचे आदेश दिले.

आपत्कालीन दलाच्या जवानांनी शनिवारी ढिगाऱ्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू केले. मात्र, चक्रीवादळामुळे उद्ध्वस्त झालेल्या इमारतींमध्ये अजूनही अनेक लोक अडकली आहेत. या चक्रीवादळाचा सिल्व्हर सिटी, रोलिंग फोर्क या शहरांसह १६० किलोमीटरपेक्षा अधिक क्षेत्राला फटका बसला असल्याचे राज्याच्या आपत्कालीन व्यवस्थापन एजन्सीने सांगितले. गव्हर्नर टेट रिव्हस यांनी ट्विटरवर सांगितले की, चक्रीवादळाचा तडाखा बसण्यापूर्वीच अनेक कुटुंबियांना अमेरिकेतील इतर राज्यांत हलवले होते. चक्रीवादळ आणि वादळामुळे प्रभावित झालेल्या लोकांसाठी अधिक रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन सेवा वाढविण्यात आली आहेत. यासोबतच मोठ्या प्रमाणात मदत आणि बचावकार्य सुरू आहे. या वादळामुळे आतापर्यंत २६ लोकांचा मृत्यू झाला आहे. या मृतांची नावे, पत्ते आणि वय अद्याप समजू शकलेले नाही. दरम्यान, शुक्रवारी आलेल्या चक्रीवादळाने लोकांना २०११ च्या वादळाची आठवण करून दिली. त्यावेळी १६१ लोकांचा मृत्यू झाला होता.

विदेश वृत्त

इंटेलचे सहसंस्थापक गॉर्डन मूर यांचे निधन

■ हवाई

इंटेल कंपनीचे सहसंस्थापक गॉर्डन मूर यांचे शनिवारी २५ मार्चला हवाई येथे निधन झाले. ते ९४ वर्षांचे होते. सेमीकंडक्टरची निर्मिती आणि आजच्या काळात वापरले जाणारे संगणक विकसित करण्यात मूर यांचे मोठे योगदान होते.

गॉर्डन अर्ले मूर यांचा जन्म ३ जानेवारी १९२९ रोजी सॅन फ्रान्सिस्को येथे झाला. मूर यांनी सेमीकंडक्टरची डिझाइन आणि त्याच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. मूर यांनी १९६८ साली काही सहकाऱ्यांसह इंटेल कंपनीची स्थापना केली. या कंपनीचे नाव पूर्वी इंटिग्रेटेड इलेक्ट्रॉनिक्स असे होते. मूर हे १९७९ मध्ये इंटेलचे सीईओ बनले. त्यांनी आठ वर्षे सीईओ म्हणून काम केले. मूर यांनी शेवटच्या काही वर्षात स्वत:ला सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात वाहून घेतले होते. गेल्या वर्षी इंटेलने त्यांच्या सन्मानार्थ ओरेगॉन येथील कार्यालयाला गॉर्डन मूर पार्क असे नाव दिले.

ट्रम्प यांच्या अटकेच्या भीतीने न्यूयॉर्क सतर्क

पोलिसांचा बंदोबस्त तैनात

■ वॉशिंग्टन

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गेल्या ४० वर्षांत अनेक कायदेशीर कारवाया झाल्या. मात्र त्यांच्यावर अद्याप क्रिमिनल केस दाखल झालेली नसताना, आता पॉर्न स्टार स्टॉर्मी डॅनियल्सने मीडियाशी संपर्क साधत २००६ मध्ये ट्रम्पसोबत अफेअर असल्याचे सांगितले आहे. अफेअर लपवण्यासाठी ट्रम्प यांच्या वकिलाने १ लाख ३० हजार डॉलर दिल्याचे म्हटले आहे. अमेरिकेत अशी ऑफर कायदेशीरित्या मान्य असली तरी पैशांची देवाणघेवाण चुकीच्या पद्धतीने झाली होती. त्यामुळे ट्रम्प यांना अटक होणार हे निश्चित असताना, मात्र या प्रकरणी आपल्याला अटक झाल्यास येथे मृत्यू आणि विनाश होईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांनी दिलेल्या या इशाऱ्यानंतर न्यूयॉर्कमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मॅनहॅटन डिस्ट्रिक्ट ॲटर्नी एल्विन ब्रॅग या प्रकरणाचा तपास करत आहेत. एल्विन यांना देखील जीवे मारण्याच्या धमक्या असलेले पत्र देखील मिळाले आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी सोशल मीडियावर कोणताही व्यक्ती कोणाही व्यक्तीवर कसलेही आरोप करू शकतो असे म्हणत, आपण कोणताही गुन्हा केलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा खोट्या आरोपामुळे होणारा विध्वंस या देशासाठी विनाशकारी असू शकतो, याची सर्वांना जाणीव असावी, असेही त्यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांचे समर्थक हिंसाचार करू शकतात, त्याचा नमुना २०२१ मध्ये सर्वांनी पाहिला आहे. २०२० मध्ये, ट्रम्प यांचा पराभव झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांकडून ६ जानेवारी २०२१ रोजी यूएस कॅपिटलमध्ये हिंसाचार घडवून आणला होता.

त्यामुळे आता ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर लोअर मॅनहॅटनमधील कोर्टहाऊसजवळ तसेच मॅनहॅटन डिस्ट्रिक्ट ॲटर्नी एल्विन ब्रॅगच्या कार्यालयाबाहेर अनेक ठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

बेलारूसमध्ये व्लादिमीर पुतिनचे अण्वस्त्रे तैनात करण्याचे नियोजन

■ मॉस्को

रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी बेलारूसमध्ये अण्वस्त्रे तैनात करणार असल्याची मोठी घोषणा केली. पुतिन म्हणाले की, 'माझ्या या निर्णयामुळे अण्वस्त्र कराराचे उल्लंघन होत नाही. अमेरिकेने आपली अण्वस्त्रे इतर देशांमध्येही तैनात केली आहेत आणि आता आम्हीही तेच करत आहोत.'

पुतिन म्हणाले की, 'बेलारूसमध्ये अण्वस्त्रे तैनात करण्यासाठी रशिया येथे विशेष स्टोरेज सुविधा तयार करत आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला हे काम पूर्ण होईल. आम्ही यापूर्वीच बेलारूसला अनेक इस्कंदर क्षेपणास्त्र प्रणाली पाठवल्या आहेत, ज्यात आण्विक वॉरहेड्स बसवता येतील. आम्ही या शस्त्रांचे नियंत्रण बेलारूसला देणार नाही. ते फक्त तिथेच तैनात असतील. आम्ही बेलारूसची १० विमाने अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम बनवली आहेत. आता पुढील महिन्यापासून आम्ही वैमानिकांचे प्रशिक्षण सुरू करणार आहोत. ब्रिटन पाठवत असलेल्या गनपावडर आणि शेलमध्ये युरेनियम आहे.

यापूर्वी मार्चमध्ये त्यांनी युक्रेनला चॅलेंजर-२ बॅटल टँक देण्याची घोषणा केली होती. पश्चिम आणि युरोपीय देश सातत्याने बेजबाबदारपणे वागत आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे मी हे पाऊल उचलले आहे. अमेरिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, 'अण्वस्त्रांशी संबंधित आमची रणनीती बदलण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही. रशियाकडून अण्वस्त्रांचा वापर होण्याचीही शक्यता नाही. नाटो देशांचे रक्षण करण्यासाठी आम्ही एकत्र उभे राहू.'

भारतीय वंशाच्या मुलीची हत्या दोषीला १०० वर्षांची शिक्षा

■ लुइसियाना

भारतीय वंशाच्या मुलीची गोळी झाडून हत्या केल्याप्रकरणी ३५ वर्षीय जोसफ ली स्मिथला न्यायालयाने १०० वर्षांची शिक्षा सुनावली. याप्रकरणी त्याला जानेवारी महिन्यात न्यालायाने दोषी ठरवण्यात आले होते.

२०२१ मध्ये लुइसियाना येथील हॉटेल सुपर ८ मोटेल येथे पार्किंगच्या मुद्यावरुन जोसफ ली स्मिथचा दुसऱ्या व्यक्तीसोबत जोरदार वाद झाला होता. या वादातून स्मिथने आपल्या बंदूकीतून गोळी झाडली. ही गोळी थेट हॉटेलच्या एका रुममध्ये खेळत असलेल्या भारतीय वंशाच्या माया पटेलच्या डोक्याला लागली. त्यानंतर जखमी मायाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची ३ दिवस मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. तिचा २३ मार्च २०२१ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. मायाचे वडील विमल आणि आई स्नेहल पटेल हे हॉटेल सुपर ८ मोटेलचे मालक आहेत आणि त्यांचे कुटुंब या हॉटेलच्या तळमजल्यावर राहत होते.

रेडी येथील प्रसिद्ध द्विभुज गणपती मंदिराच्या कलशाचे भव्य आगमन

■ वेंगुर्ला

रेडी येथील प्रसिद्ध श्री द्विभुज गणपती मंदिरात श्री गजानन संप्रोक्षण कलशारोहण सोहळा २६ ते २८ मार्च या कालावधीत साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी रात्री ढोल-ताशांच्या गजरात कलशाचे रेडी येथे गणपती मंदिरात आगमन झाले आहे. या भव्यदिव्य सोहळ्यानिमित्त गावात उत्साहाचे वातावरण आहे.

या सोहळ्याला येणाऱ्या भाविकांचेही जोरदार स्वागत करण्यात येते. रस्त्यारस्त्यावर रांगोळी काढण्यात आली आहे. मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाईही केली आहे. तर मंदिर परिसरात विविध दुकाने थाटली आहेत. एकूण या रेडी गावात जत्रौत्सवाचे स्वरुप आले आहे. शुक्रवारी कलशाचे भव्य मिरवणुकीने मंदिरात आगमन झाले असून, तत्पूर्वी वेंगुर्ला शहरातील ग्रामदेवी श्री सातेरी व ग्रामदेव श्री रामेश्वर मंदिर परिसरात कलश नेऊन दोन्ही ठिकाणच्या देवतांना श्रीफळ ठेवण्यात आले. त्यानंतर बाजारपेठ मार्गे ही मिरवणूक रेडी येथे जाण्यास मार्गस्थ झाली. रेडी हुडा ते गणपती मंदिर अशी ढोलताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. २८ ला हा कलशारोहण सोहळा होणार आहे. रेडी येथे हा भव्य दिव्य सोहळा अनेक धार्मिक आणि विविध कार्यक्रमांसह पार पडणार आहे. तीन दिवसांचा हा सोहळा या गावासाठी एक उत्सव आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आरटीई मार्गदर्शन केंद्र शोभेचे

■ पिंपरी, प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरू केलेले आरटीईसाठीचे मदत केंद्र केवळ शोभेचे बनले आहे. विद्यार्थ्यांना केवळ मार्गदर्शन करण्यापुरतेच हे केंद्र मर्यादित राहिले आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यास नकारघंटा दिली जात असल्याच्या तक्रारी पालक करत आहेत. परिणामी अनेकांना खासगी महा-ई-सेवा केंद्राचा आधार घ्यावा लागत आहे. तिथे त्यांची आर्थिक लूट होत असल्याने पालकांमधून संतापाची भावना व्यक्त होत आहे.

सध्या आरटीई ऑनलाइन प्रवेश अर्जासाठी संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरण्याचे काम सुरू आहे. वेबसाइट हँग होणे आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे पालकांना अर्ज भरण्यात अडचणी येत आहेत. बहुतांश आरटीई पालक हे अल्प शिक्षित आणि इंटरनेटचे ज्ञान नसल्याने महा-ई-सेवा केंद्रात अर्ज भरत आहेत. आरटीई अर्ज भरून देणाऱ्या केंद्रांचा शहरात सुळसुळाट झाला असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी अर्ज भरण्यासाठी पालकांकडून शंभर ते पाचशे रुपये उकळले जात आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात तब्बल १३ वर्षांनी चार बछड्यांचा जन्म

■ मुंबई

बोरीवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात तब्बल १३ वर्षांनी चार बछड्यांचा जन्म झाला आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास श्रीवल्ली या वाघिणीने ४ बछड्यांना जन्म दिला. बाजीराव वाघ आणि श्रीवल्ली वाघिणीची ही पिल्ले असून, ती संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल बनगर यांच्या देखरेखीखाली आहेत. या बछड्यांमुळे प्राणिसंग्रहालयातील वाघांची संख्या आता १० वर गेली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सन २०१० मध्ये बछड्यांचा जन्म झाला होता. बंदिस्त वातावरणात राहणाऱ्या प्राण्यांना जन्म देणे ही सोपी गोष्ट नसते, असे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनपरिक्षेत्र अधिकारी विजय बारब्दे यांनी सांगितले. श्रीवल्लीला मार्च २०२२मध्ये उद्यानात ताडोबा येथून आणले होते. तर बाजीरावला चंद्रपूर जिल्ह्यात राजोरा येथून डिसेंबर २०२० मध्ये आणले होते.

श्रीवल्लीची ही पहिलीच गर्भधारणा असल्याने तिला वेगळे ठेवण्यात आले होते. तिच्यासाठी गुहेप्रमाणे उबदार वातावरण तयार करण्यात आले. तिने नैसर्गिक पद्धतीने बछड्यांना जन्म दिला असून, तिला आणि बछड्यांना त्रास होऊ नये, यासाठी तिच्या आसपास शनिवारी अधिकारीही फिरकले नव्हते. श्रीवल्ली जेव्हा त्यांच्या पिंजऱ्यापासून दूर जाईल, तेव्हा उपलब्ध वेळेत बछड्यांचे वजन तपासून, त्या जागेची साफसफाई करण्यात येईल. त्यानंतर १५ दिवसांमधून एकदा वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.' अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दिली.

नेत्रावती आणि नागरकोईल एक्स्प्रेसला काणकोणमध्ये थांबा

■ कणकवली

कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या व सिंधुदुर्गात थांबा असणाऱ्या एलटीटी-थिरुवनंतपूरम एलटीटी नेत्रावती एक्स्प्रेस व नागरकोइल गांधीधाम- नागरकोइल एक्स्प्रेस या दोन प्रवासी रेल्वे गाड्यांना आता काणकोण रेल्वे स्थानकावर थांबा देण्यात येणार आहे. हा थांबा प्रायोगिक तत्वावर असल्याची माहिती कोकण रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

कोकण रेल्वे प्रशासनाची माहिती

एक्सप्रेसचा थांबा प्रायोगिक तत्त्वावर

त्यानुसार एलटीटी-थिरुवनंतपूरम नेत्रावती (१६३४५) काणकोण येथे नॉनमान्सून कालावधीत रात्री ११.२८ला पोहोचून ११.३०वा सुटेल. मान्सून कालावधीत रात्री १२.१४ वा. पोहोचून १२.१६ वा. सुटेल. तर थिरुवनंतपूरम-एलटीटी नेत्रावती (१६३४६)काणकोण येथे नॉन मान्सून कालावधीत पहाटे ३.५२ पोहोचून ३. ५४ वा. सुटेल. मान्सून कालावधीत पहाटे २.५० वा. पोहोचून २.५२ वा. सुटेल. हा थांबा २ एप्रिलपासून सुरू होणार आहे.

जम्मू काश्मीरला पुढील वर्षी 'वंदे भारत' रेल्वे मिळणार

■ श्रीनगर

देशातील प्रीमियम सेमी-हाय स्पीड वंदे भारत ट्रेन पुढील वर्षापासून काश्मीर खोऱ्यात धावणार आहे. काश्मीरसाठी खास वंदे भारत ट्रेन तयार करण्यात येत आहे. अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. रेल्वेमंत्री शनिवारी २५ मार्चला जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर होते. यावेळी केंद्रशासित प्रदेशाबाबत ते म्हणाले की, खास वंदे भारत ट्रेन तयार केली जात आहे. ही स्पेशल ट्रेन बनवताना तापमान, बर्फ या सर्व गोष्टी लक्षात ठेवण्यात आल्या आहेत.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दौऱ्यावर असलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांसह बडगाम स्टेशन ते बारामुल्ला असा रेल्वेने प्रवास केला. या दोन दिवसांत काश्मीरमधील रेल्वे प्रकल्पांची पाहणी केली. यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्री म्हणाले की, उधमपूर-श्रीनगर- बारामुल्ला रेल्वे मार्गावर चांगला विकास झाला आहे. चिनाब आणि अंजी पूल आणि महत्त्वाचे बोगदे बांधण्याचे कामही सुरू आहे. सोपोर कुपवाडा, अवंतीपुरा-शोपियन आणि बिजबेहारा-पहलगाम या तीन भागांना रेल्वेमार्गाने जोडण्याची मागणी करण्यात आली असून, त्यावर विचार केला जाईल.'

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

अंतराळ क्षेत्रातले नवे भारतीय विक्रम

भारताच्या अंतराळ क्षेत्रातील भरारीची मोहीम जारी आहे. श्रीहरीकोट्टा येथून एकाचवेळी छत्तीस छोटे उपग्रह प्रक्षेपित करण्याचा आणखी एक विक्रम नोंदला गेला आहे. एल व्ही एम - ३ एम या नावाचे हे उपग्रह प्रक्षेपित झाले आहेत. पर्यावरण, शेती, आणि दूरसंदेशवहन अशा वेगवेगळ्या कामांसाठी हे उपग्रह उपयुक्त ठरणार आहेत. एकेकाळी किंबहुना तीस वर्षांपूर्वी भारताला आपला एक जरी उपग्रह सोडायचा असला तरी पाच पाच, दहा दहा वर्षे तयारी करावी लागत असे आणि त्याच्या उड्डाणाकरिता अमेरिका, रशिया, यांच्यावर अवंलबून राहावे लागत असे. या प्रक्षेपणासाठी आवश्यक असलेले क्रायोजेनिक इंजिन भारताकडे नव्हते. परिणामी या देशांच्या मदतीशिवाय भारताचा कोणताच अंतराळविषयक प्रकल्प यशस्वी होऊ शकत नव्हता. मात्र गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये भारतातील अवकाश संशोधन क्षेत्राने विलक्षण झेप घेतलेली दिसून येते. पाच वर्षांपूर्वी तर जवळपास शंभर उपग्रह एकाचवेळी प्रक्षेपित करण्याचा जागतिक विक्रम भारताने नोंदवला. आणि विशेष म्हणजे जगाच्या तुलनेमध्ये सर्वात कमी खर्चाचा उपग्रह प्रक्षेपण प्रकल्प ठरला होता. यापूर्वीच्या अनेक मुख्य ग्रहांच्या प्रक्षेपणासाठी कोट्यवधीचा खर्च होत असे. आणि तो एकूणच विज्ञान संशोधनाचा भाग असल्याने त्याचे समर्थनही केले जात होते. परंतु इतका मोठा खर्च होऊनही अपेक्षेप्रमाणे अंतराळ संशोधनामध्ये प्रगती होत नव्हती. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या पुढाकाराने अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न सुरू झाला आणि त्याला यश आले. कारण आपला या क्षेत्रातील संशोधकांकडे किंवा वैज्ञानिकांकडे इतर देशांपेक्षा जास्त बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता असूनही त्यांना समाधानकारकरित्या काम करता येत नव्हते. त्यांची ही अडचण लक्षात घेऊन संशोधनाच्या प्रकल्पांमध्ये त्यांना अधिकाधिक स्वातंत्र्य दिले गेले. त्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून दिला आणि त्याचे योग्य ते परिणाम पुढच्या काही वर्षांतच पाहायला मिळाले. आतासुध्दा एकाचवेळी छत्तीस छोट्या मोठ्या उपग्रहांचे प्रक्षेपण यशस्वी करून दाखवण्याचा प्रयोग हा या संशोधकांच्या जिद्द आणि परिश्रमाचेच फळ ठरते.

स्काय इज लिमिट

ज्याला कर्तृत्व सिध्द करायचे असते किंवा यश मिळवायचे असते त्याला आकाशसुद्धा अपुरे पडते. अशीच आज भारताच्या अंतराळ क्षेत्राची भरारी म्हणता येईल. सतत यशस्वी होत असलेल्या त्यांच्या प्रकल्पांचा आढावा घेतला तर त्यांच्यासाठी 'स्काय इज द लिमिट' असेच म्हणावे लागेल. आपल्या देशाचा प्रचंड भूभाग तितकीच मोठी लोकसंख्या, विविध प्रकारचे हवामान किंवा ऋतुमान आणि खेड्यात राहात असलेली ऐंशी टक्के जनता शिवाय कृषीप्रधान असलेला आपला देश या मुख्य गोष्टी लक्षात घेतल्या तर अनेक क्षेत्रांमध्ये सातत्याने संशोधन करीत राहणे, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून या देशाचे जनजीवन अधिकाधिक सुविधाजनक करणे आवश्यक ठरते. मनुष्यबळ किंवा बौध्दिक क्षमता याबाबतीत भारताकडे कोणतीच कमतरता नाही फक्त त्या बुद्धिमत्तेचा कौशल्याने वापर करून घेणे किंवा त्या गुणवत्तेची कदर करून त्याला सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. म्हणूनच काही वर्षातला अंतराळ संशोधन क्षेत्रातला भारताचा प्रवास म्हणजेच मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग करून घेणारा ठरतो. इतर देशांवर अवलंबून असलेला भारत आता या क्षेत्रात विकसित देशांनासुध्दा मदत करू लागला आहे आणि अनेक विकसनशील देशांच्या उपग्रहांचे प्रक्षेपणही करून देऊ लागला आहे. म्हणजेच अमेरिकेमध्ये नासासारखे केंद्र जिथे जगातील गुणवत्ता एकवटली असल्याचे पाहायला मिळते. भारतातीलही अनेक तरुण आणि संशोधक नासामध्ये काम करतात. मात्र आता सुरु केलेली ही मोहीम या देशातल्या तरुण संशोधकांना आकर्षित करते आहे. पुढच्या काही वर्षांमध्ये भारत हे अंतराळ संशोधन केंद्रातले जागतिक कीर्तिचे एक केंद्र ठरू शकेल एवढी क्षमता आता भारताने मिळवली आहे. दुर्दैवाने अजूनही या सगळ्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधनाकडे पाहिजे तसे लक्ष दिले जात नाही. राजकीय अस्थिरता आणि राजकीय हेतूने निर्णय घेण्याची आपल्या देशातील पध्दत त्याचे दुष्परिणाम या क्षेत्राला भोगावे लागतात. अर्थात अशा विपरित परिस्थितीतही भारताचे हे अंतराळ संशोधन केंद्र जर आपल्या या बुद्धिमत्तेचेच नवे प्रक्षेपण करीत असेल तर त्याचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच ठरते.

जागतिक स्पर्धेत भारत

यश संपादन करण्याची आणि देशहित लक्षात घेऊन येणाऱ्या अडचणींना तोंड देण्याची भारतीय संशोधकांची तयारी म्हणजे देशाला खऱ्या अर्थाने जागतिक स्पर्धेत यशस्वी करण्याचा प्रामाणिक प्रयत्नच ठरतो. जेव्हा एकाचवेळी तीस तीस किंवा त्यापेक्षा अधिक संख्येचे उपग्रह एकाचवेळी अवकाशात झेप घेतात त्यावेळेला वापरल्या गेलेल्या तंत्रज्ञानाचा प्रभाव जगभर उमटतो. आताच्या या नव्या मोहिमेतून भारताने पुन्हा एकदा जगाला आपली क्षमता दाखवून दिलेली आहे. अल्पावधीत यशाची परमावधी गाठण्याचा हा प्रयोग नक्कीच नव्या भविष्याचा वेध घेणारा ठरतो. यातला एक महत्त्वाचा भाग म्हणजे भारतात असलेली तरुणांची सर्वात मोठी लोकसंख्या आणि त्यांच्यात असलेली आव्हाने पेलण्याची क्षमता याचा जर विचार केला तर ज्या अंतराळ संशोधनात भारत अग्रेसर असतो त्यामध्ये या मनुष्यशक्तीला विचारात घेतले पाहिजे. त्यांना या सगळ्या मोहिमांमधून प्रेरणा मिळेल. त्यांच्यातील संशोधक वृत्ती अधिक प्रभावी होईल. किंबहुना त्यांच्यातील नैपुण्याला अधिक व्यापक संधी मिळेल अशा योजनाही आखल्या गेल्या पाहिजेत. तरच या अंतराळ संशोधनातल्या यशाचे चीज झाले असे म्हणता येईल. देशभरात आयआयटी आणि आयआयएमचे जाळे विस्तारते आहे. त्यांच्या अभ्यासक्रमांमधून त्यांना अनुमोदन दिले गेले पाहिजे. अंतराळातल्या या संधीसुध्दा देशातील युवकांचे ग्रह बदलणाऱ्या आणि प्रेरणा देणाऱ्या ठरू शकतात. म्हणूनच हा सगळा उपक्रम वरकरणी जरी सरकारी वाटत असला तरी तो देशातील युवक वर्गाला सहभागी करून घेणारा ठरला तर त्याचे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय मूल्यांकन झाले असे म्हणता येईल.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

आपल्या आयुष्यातील चांगल्या माणसांचं महत्त्व आणि स्थान हृदयातील ठोक्यांसारखं असतं. जे कधीही दिसत नाही, पण त्यांची स्पंदनं, त्यांचं अस्तित्व, आपणास सदैव जाणवतं. जीवनातील अशी माणसं कायम जपावीत.

पंचांग

सोमवार, २७ मार्च २०२३
शक १९४५ शोभननामसंवत्सर

चैत्र शुक्ल षष्ठी * नक्षत्र : रोहिणी

रवी उदय- ०६-३९
रवी अस्त- १८-५०

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृषभ

स्कंद षष्ठी, ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा, जागतिक रंगभूमी दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

स्वीट पोटॅटो कॅसरोल

★ **साहित्य :-** स्वीट पोटॅटो - २ - भारतात कदाचित रताळी वापरून करता येईल. बटर - २ टेबलस्पून (अन सॉल्टेड), क्रीम/दूध - २ टेबलस्पून, ब्राऊन शुगर - (उगीच गैर अर्थ काढू नयेत) - १ चमचा - तुमच्या आवडीनुसार, मेपल सिरप - १ चमचा, थोडेसे मीठ - अगदी चिमूटभर - सॉल्टेड बटर असेल तर मीठ नाही घातले तरी चालेल, दालचिनी पावडर, जायफळ पावडर, कँडीड सिरप - अक्रोड वापरले तरी चालतील - सजावटीकरता. ★ **कृती:-** १) स्वीट पोटॅटो साले काढून, धुवून उकडून घ्या. २) ते गरम असतानाच मॅश करा. त्यात बटर घालून मॅश करा. ३) हे नीट मॅश होऊन गुठळ्या आणि रेशा गेल्या की, मग त्याच्यात दूध आणि ब्राऊन शुगर घालून हलवा. त्याच वेळेस मेपल सिरप पण घाला. ४) थोडे सैलसर मिश्रण झाले की, त्यात मीठ, दालचिनी आणि जायफळ पावडर घाला. ५) हे सगळे मिश्रण एका ओव्हन सेफ भांड्यात टाका. ६) त्यावर कँडीड शिलरप लावा. तुम्हाला आवडेल अशी नक्षी करा. ७) २५-३० मिनिटे बेक करा. ८) थोडे सेट झाले की खायला द्या.

बॅडमिंटनमध्ये भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा सात्विक-चिराग जोडी स्वीस ओपन चॅम्पियन

परदेशी भूमीवर जबरदस्त खेळ करून एखाद्या स्पर्धेचा खिताब पटकावणे हे निश्चितच अभिमानास्पद म्हणावे लागेल. आज भारताच्या सात्विक साईराजरिंकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने हीच किमया करून दाखवली आहे. या जोडीने स्वीस ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत चीनच्या टँग क्रियान आणि रेन यु झियांग या जोडीचा २१-१९, २४-२२ अशा सरळ सेट मध्ये पराभव करून या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. बॅडमिंटन मध्ये भारताच्या शिरपेचात हा मानाचा तुरा म्हणावा लागेल. या स्पर्धेत महिला एकेरीत भारताची स्टार बॅडमिंटन खेळाडू पीव्ही सिंधू पहिल्याच फेरीत पराभूत झाली होती.

■ नवी दिल्ली

स्वीस ओपन सुपर सिरीज ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत सात्विक आणि चिराग या भारतीय जोडीने सुरुवातीपासूनच चांगला खेळ करीत अंतिम फेरीत धडक मारली होती.

अंतिम फेरीत त्यांची लढत चीनच्या टँग क्रियान आणि रेन यु झियांग यांच्याशी होती. सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय खेळाडूंनी आक्रमक खेळ करीत चिनी जोडीवर दबाव टाकीत पहिला सेट २१-१९ असा सहजपणे जिंकला. मात्र दुसऱ्या सेट मध्ये चिनी खेळाडूंनी चिवट प्रतिकार करायला सुरुवात केली. मात्र त्यांचा हा कडवा प्रतिकार चिराग आणि सात्विकने तितक्याच निकराने मोडून काढला आणि दुसरा सेठ २४-२२ असा जिंकून या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. या विजयानंतर या जोडीवर देशवासियांकडून आणि खास करून बॅडमिंटन प्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वास्तविक अंतिम फेरीपेक्षा उपांत्य फेरीत या जोडीला प्रतिस्पर्ध्यांकडून कडवा प्रतिकार झाला होता. उपांत्य फेरीत डेन्मार्कच्या जेपे बे आणि लेसे मोलेहेडे या जोडीशी तब्बल ८४ मिनिटांपर्यंत चिराग -सात्विकला संघर्ष करावा लागला होता. सुदैवाने भारतीय खेळाडूंनी हा सामना १५-२१,२१-११, आणि २१-१४ अशा गुणांनी जिंकला आणि अंतिम फेरीत धडक दिली.

त्या मानाने अंतिम फेरीत त्यांना चिनी खेळाडूंकडून तितकासा प्रतिकार झाला नाही. विशेष म्हणजे या स्पर्धेत भारताची स्टार खेळाडू पीव्ही सिंधू , एच एस, प्रणय, लक्ष सेन, श्रीकांत कदम्बी हे सर्वच स्टार खेळाडू पराभूत झाले होते पण पुरुष दुहेरीत सात्विक आणि चिराग जोडीने इतिहास घडवला.

वेस्ट इंडिजने केला द.आफ्रिकेचा पराभव

केपटाऊन - दक्षिण आफ्रिका विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील ३ टी २० सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना वेस्ट इंडिजने ३ गडी राखून जिंकला . या सामन्यात पावसाने व्यत्यय आणल्यामुळे हा सामना २० ऐवजी ११ ओव्हरचा खेळवण्यात आला. आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १३१ धावा केल्या मात्र वेस्ट इंडीचा कर्णधार रोमन पॉवेल याने नाबाद ४३ धावा केल्याने ११ व्या ओव्हरमध्येच वेस्ट इंडिजने ३ चेंडू आणि ३ गडी राखून हा सामना जिंकला व मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

निकाहत-लवलीनाचा बॉक्सिंगमध्ये गोल्डन पंच

» पान १ वरून

दिल्लीत झालेल्या महिला विश्वचॅम्पियनशीप बॉक्सिंग स्पर्धेत भारताच्या निकाह जरीन हिने ५० किलो वजनी गटात व्हिएतनामच्या गुयेन थीटॅम हिला ५-० ने पराभूत करून सुवर्णपदक पटकावले. पहिल्या फेरीत निकाहतने निर्विवाद बाजी मारली होती, पण दुसऱ्या फेरीत मात्र तिला प्रतिस्पर्ध्याकडून कडवा प्रतिकार झाला. मात्र तरीही तिने सुवर्णपदक पटकावले. तर ७५ किलो वजनी गटात भारताच्या लवलीना बॉर्गोहेम हिने ऑस्ट्रेलियाच्या कॅटलीन पार्कर हिचा ५-२ अशा गुणांनी पराभव करीत सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेत प्रथम नितू घंघाशने ४५-४८ किलो वजनी गटात देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यानंतर स्वीटी बुरा हिनेही ७५-८१ किलो वजनी गटात भारताला सुवर्णपदक मिळवून दिले आणि त्यानंतर आज निकाहत जरीन हिने ५० किलो वजनी गटात तर लवलीना बोर्गोहेम हिने ७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळवून दिले. या चारही महिला बॉक्सरने आपल्या प्रतिस्पर्ध्यांबरोबर लढताना अत्यंत आक्रमकपणे त्यांच्यावर हल्ले करून लागोपाठ गुण घेतले. निकाहतने तर प्रतिस्पर्धी बॉक्सरला संधीच मिळू दिली नाही. मात्र ऑस्ट्रेलियन बॉक्सर कॅटलीना आणि भारताच्या लवलीना हिचा सामना काहीसा संघर्षपूर्ण झाला. पण तरीही लवलीनाने ५-२ ने विजय मिळवला.

पहिली महिला प्रीमिअर लीग! मुंबई इंडियन्स चॅम्पियन

■ मुंबई

आज मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल यांच्यात महिला प्रीमिअर लीगच्या अंतिम फेरीचा सामना होता. दिल्लीने नाणेफेक जिंकून फलंदाजी घेतली. परंतु त्यांची सुरुवात खराब झाली. सलामीची शेफाली वर्मा ११ धावांवर बाद झाली. पाठोपाठ कॅप्सी शुन्यावर परतली. तर जेमिना रॉड्रीक्स ९ धावांवर बाद झाली. हे तिन्ही बळी वॉंगने घेतले. तर दुसरीकडे कर्णधार लेनींग हिने एक बाजू लावून धरली होती. तिने ३५ धावा केल्या. परंतु काप १८, जॉन्सेन २, रेड्डी ०, मनी १, भाटिया ० या झटपट बाद झाल्या. केवळ शिखा पांडे २७ आणि राधा यादव नाबाद २७ यांच्या फलंदाजीमुळे दिल्लीला २० षटकांत ९ बाद १३१ धावा करता आल्या. मुंबईकडून वॉंगने ३, मॅथ्युजने ३ तर केरने २ बळी घेतले. दरम्यान मुंबईची सुरुवात ही खराब झाली. सलामीची हिने मॅथ्युज १३ धावांवर तंबुत परतली. तर यास्तीका भाटियाला राधा यादवने ४ धावांवर बाद केले. मात्र ब्रन्ट आणि कर्णधार हरमनप्रित कौर यांनी सावधपणे फलंदाजी करून ७२ धावांची भागीदारी केली. पण हरमनप्रित या सामन्यातही धावचित झाली. तिने ३७ धावा केल्या. त्यानंतर ब्रंट आणि केर यांनी मुंबईला विजय मिळवून दिला. ब्रंटने नाबाद ६० तर केरने नाबाद १४ धावा केल्या.

'मुंबई श्री'चे ३ वर्षांनी पुनरागमन

■ मुंबई

येत्या ३१ मार्च आणि १ एप्रिलला होणाऱ्या मुंबई श्री स्पर्धेला सलग तिसऱ्या वर्षी स्पार्टन मुंबई श्री म्हणून ओळखले जाईल. त्यामुळे पुन्हा एकदा मुंबईतील शरीरसौष्ठवपटूंच्या हृदयात सर्वोच्च स्थानी असलेल्या या स्पर्धे चे यंदाही दिमाखदार आयोजन केले जाणार असल्याची ग्वाही बृहन्मुंबई आणि उपनगर शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष अमोल कीर्तीकर आणि अजय खानविलकर यांनी दिली.

शरीरसौष्ठवपटूंचे पहिले प्रेम असलेल्या आणि लखपती करणाऱ्या या स्पर्धेच्या आयोजनासाठी गेले दोन महिने बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटना आणि मुंबई उपनगर शरीरसौष्ठव आणि फिटनेस संघटना जोरदार तयारी करत आहे. या स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमी सुबोध मेनन यांचेही सहकार्य लाभले आहे. मुंबई श्री स्पर्धेत किमान २५० खेळाडू सहभाग घेतील, असा प्राथमिक अंदाज आहे. निलेश दगडे, रोहन गुरव, सुशांत रांजणकर, उमेश गुप्ता, सुशांत पवार, दिपक तांबिटकरसारखे खेळाडू आपले मुंबई श्रीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न करतील. स्पर्धेतील विजेत्याला सवा लाखांचे इनाम दिले जाणार आहे.

'महती मैदानां'ची पुस्तकाचा ३० मार्चला प्रकाशन सोहळा

■ मुंबई

मैदान बचाव चळवळीचे सर्वेसर्वा भास्कर सावंत यांच्या महती मैदानांची या पुस्तकाचे प्रकाशन येत्या ३० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता दादर पश्चिम येथील अमर हिंद मंडळाच्या सभागृहात ज्येष्ठ सामाजिक, क्रीडा कार्यकर्ते उदयदादा लाड यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर, सेवा दलाचे अध्यक्ष नितीन वैद्य, राज्य बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष जय कवळी, अमर हिंद मंडळाचे विश्वस्त अरुण देशपांडे हे उपस्थित राहणार आहेत. दत्ता सावंत या प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन करतील.

मोरोक्कोचा ब्राझीलवर ऐतिहासिक विजय

■ टँझीयर

तब्बल ५ वेळा फुटबॉलचा वर्ल्डकप जिंकणाऱ्या बलाढ्य ब्राझीलला मोरोक्कोने २-१ असे पराभूत केले. मोरोक्कोतील बतूता स्टेडियमवर ६५ हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत ब्राझील आणि मोरोक्को यांच्यातील मैत्रीपूर्ण लढत झाली २९ व्या मिनिटाला मोरोक्कोच्या बोफाळणेने गोल करून आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ब्राझीलच्या कैसिमीरा याने गोल केला. त्यामुळे १-१ अशी बरोबरी झाली मात्र ७९ व्या मिनिटाला मोरोक्कोच्या सबिरी याने गोल करून २-१ अशी आघाडी घेतली आणि तीच अखेरपर्यंत निर्णायक ठरली.

भावेश-विजय जोडीने दादा खानोलकर स्मृती एसपीजी टेनिस स्पर्धा जिंकली

■ मुंबई

शिवाजी पार्क जिमखानातर्फे झालेली टेनिस संघटक पी.एस. उर्फ दादा खानोलकर स्मृती एसपीजी दुहेरी टेनिस स्पर्धा भावेश नवलु-विजय गिरी जोडीने जिंकली. भावेश नवलु-विजय गिरी जोडीने मंगेश इनामे-अक्षय इनामे जोडीचा ५ गुणांच्या फरकाने पराभव करून विजेतेपदाला सहज गवसणी घातली. दादर-पश्चिम येथील एसपीजी टेनिस कोर्टवर 'सेक्युरिटी एचक्यू' कंपनी पुरस्कृत स्पर्धेला मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सदिच्छा भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

टेनिस मार्कर व सहाय्यक प्रशिक्षक यांच्यासाठी मर्यादित असलेली सातवी दादा खानोलकर स्मृती एसपीजी टेनिस स्पर्धा शिवाजी पार्क जिमखान्यात संपन्न झाली. यंदा मुंबई शहर व उपनगरसह ठाणे, पालघर, सोलापूर, नागपूर, अहमदाबाद, बडोदा, हैद्राबाद आदी जिल्ह्यातील २७० खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यामधील अंतिम फेरीत भावेश नवलु व विजय गिरी जोडीने प्रथमपासून सर्वांगसुंदर खेळ करून मंगेश इनामे व अक्षय इनामे जोडीवर ६-१ अशी सहज मात केली. मंगेश-अक्षय इनामे जोडीला सूर न सापडल्यामुळे अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण रु.८०,०००/- रक्कमेचे पुरस्कार एसपीजीचे जनरल सेक्रेटरी संजीव खानोलकर, असिस्टंट जनरल सेक्रेटरी सुनील रामचंद्रन, टेनिस सेक्रेटरी योगेश परुळेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आले.

डॉमिनोज पिझ्झाचे जनक टॉम मोनॅगम

डॉमिनोज हा जगभरात चवीने खाल्ला जाणारा दुसरा सर्वात मोठा पिझ्झा ब्रॅण्ड. 'ऑर्डर केल्यानंतर ३० मिनिटांत घरपोच पिझ्झा आणि उशीर झाल्यास तो मोफत' अशी आकर्षक जाहिरातबाजी करणारं 'डॉमिनोज' हे नाव आपल्याला चांगलंच परिचयाचं झालं आहे. पिझ्झाची सामान्य भारतीयांना ओळख करून दिली ती डॉमिनोजने असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. पिझ्झा बनवणारा हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा मोठा ब्रँड आहे. आज जगभरात डॉमिनोजची १३ हजारांहून अधिक आउटलेट्स आहेत.



पिझ्झेरियात जाऊन पिझ्झा खाणारे आणि घरच्या घरी पिझ्झा मागवून सगळ्यांसोबत एन्जॉय करणारे असे दोन वर्ग मानले तर दुसऱ्या वर्गासाठी डॉमिनोज ही ट्रीट आहे. या चवदार प्रवासाची सुरुवात १९६० मध्ये झाली. टॉम मोनॅगन आणि जेम्स मोनॅगन. या दोन भावांना व्यवसायात उतरावसं वाटलं. त्यातही खवय्येगिरी आणि अमेरिकन मंडळींमध्ये वाढती पिझ्झाक्रेझ लक्षात घेऊन त्यांनी एक पिझ्झेरिया चालवायला घेतला. डोमिनिक्स या नावाने चालवायला घेतलेलं हे पिझ्झा शॉप अगदी थोडय़ा कालावधीत अमेरिकेतील मिशिगन सिटीत लोकप्रिय झालं. फक्त १०० डॉलर्सला विकत घेतलेलं हे दुकान भविष्यातील एवढय़ा मोठय़ा साम्राज्याचा पाया असेल याचा विचारही दोघा बंधूंनी केला नसेल. कुठलाही व्यवसाय घ्या, सुरुवातीला उत्साहाने एकत्र येणारे भागीदार शेवटपर्यंत टिकून राहिलेत असं दृश्य फार मोजक्या ब्रॅण्डच्या बाबतीत दिसून येतं. टॉम आणि जेम्सपैकी जेम्सला कार विकत घ्यायची प्रबळ इच्छा होती. त्या महागडय़ा कारसाठी त्याने आपले डॉमिनिक्समधले हक्क टॉमला विकले आणि तो व्यवसायातून बाहेर पडला. टॉम या पिझ्झेरियाचा एकल मालक झाला. नशिबाच्या पाऊलखुणा आपल्याला ओळखता येत नाहीत हे खरंच दुर्दैव! अन्यथा भविष्यात वटवृक्षाप्रमाणे विस्तारल्या गेलेल्या व्यवसायातून एका कारखरेदीसाठी बाहेर पडण्याची बुद्धी जेम्सला झाली नसती. टॉम त्याच्या मेहनतीने पिझ्झेरिया कुशलपणे हाताळत होता आणि थोडय़ाच काळात एका दुकानाची तीन दुकाने झाली. मात्र मूळ मालकाने डॉमिनिक्स हे नाव अन्य दुकानांना वापरण्यास मनाई केली आणि इथे एक नवं वळण नाइलाजाने टॉमला घ्यावं लागलं. डॉमिनिक्स हे नाव बदलताना पुन्हा नव्या नावासह लोक स्वीकारतील का? ही धाकधूक त्याच्या मनात असावी आणि त्यामुळे जुन्या नावाच्या जवळ जाणारं पण तांत्रिकदृष्टय़ा वेगळं ठरेल असं नाव त्याने स्वीकारलं. तेच हे डॉमिनोज; पण या नामबदलाने उलट टॉमला फायदा करून दिला. काही नावं यशस्वी होण्यासाठीच जन्माला येतात हा दिलासाही दिला. डॉमिनोज पिझ्झाने फार कमी काळात आपल्या खुणा निर्माण केल्या. १९८३ पर्यंत १००० डॉमिनोज पिझ्झा पार्लर्स सर्वदूर पसरली होती. या दुकानांना एका धाग्यात बांधेल अशा लोगोचा विचार टॉमने फार आधी केला. पहिला पिझ्झेरिया हे भावासोबतचं व्यावसायिक पाऊल होतं, मात्र एकाची तीन पिझ्झा पार्लर्सही टॉमसाठी खूपच महत्त्वाची गोष्ट होती आणि ती लक्षात ठेवून त्या तीन दुकानांची आठवण देणारी तीन टिंबे, तीन डॉट्स डॉमिनोजच्या लाल, निळ्या लोगोवर अवतरली. मुळात सुरुवातीला गडद लाल, निळा व शुभ्र पांढरा रंग वापरण्यामागे लोकांचं लक्ष वेधणं हा हेतू होता. हे तीन रंग खूप प्रामुख्याने दिसतात हे लक्षात घेऊन ते निवडताना तीन दुकानांची आठवण तीन टिंबांसह लोगोवर उमटली. कशी गंमत आहे बघा. आज डॉमिनोजने १३२०० दुकानांचा पल्ला गाठला आहे; पण एकाचे तीन होतानाचा अनुभव टॉमसाठी नेहमीच खास राहिला. काही वेळा व्यवसायात मोठय़ा मोठय़ा भराऱ्यांपेक्षा हे छोटे छोटे टप्पेच जास्त जिव्हाळ्याचे असतात याचं हे उत्तम उदाहरण. डॉमिनोज पिझ्झाचं २०१२ मध्ये केवळ डॉमिनोज असं नामांतर झालं, कारण डॉमिनोज म्हटलं की पिझ्झा हे समीकरण तर जुळलंच होतं, पण पिझ्झ्यासोबत इतर अनेक खाद्यपदार्थही मिळू लागले होते, त्यामुळे पिझ्झा हा शब्द गाळून केवळ डॉमिनोज असे नाव ठेवण्यात आले. या इतक्या वर्षांमध्ये सातत्याने काही नावीन्यपूर्ण देण्याचा डॉमिनोजने प्रयत्न केला. २००८ मध्ये त्यांनी पिझ्झा ट्रॅकर आणला, ज्यामुळे आपल्या पिझ्झा डिलिव्हरीची नेमकी स्थिती आपल्याला ट्रॅक करता येऊ लागली. २००९ मध्ये तर डॉमिनोजने आपल्यावर टीका करणाऱ्या ग्राहकांना चित्रित करण्याचं धाडसी पाऊल उचललं. म्हणजे टीका करणारे ग्राहक आणि त्यांची टीका लक्षात घेऊन ताबडतोब आपल्या पिझ्झामध्ये नवे बदल आणणारे शेफ अशी ती मालिका गाजली, कारण आपल्याच ब्रॅण्डवर होणाऱ्या टीकेला जगासमोर आणण्याचं धाडस अनोखं होतं. या वर्षी डॉमिनोजने आपल्या पिझ्झामध्ये आमूलाग्र बदल केले.

२०१६ मध्ये डॉमिनोजने ड्रोनच्या मदतीने मानवरहित पिझ्झा डिलिव्हरी न्यूझीलंडमध्ये केली. कोणत्याही ब्रॅण्डचं सर्वात मोठं यश तेच असतं जेव्हा त्या ब्रॅण्डचं नाव उच्चारताच त्या उत्पादनाखेरीज अन्य कोणतेही उत्पादन डोळ्यांसमोर येत नाही. डॉमिनोज या नावाने ते साध्य केलं आहे. हे नाव अपरिहार्यतेतून टॉमने स्वीकारलं आणि त्याच नावाने इतिहास घडवला. हा इतिहास जिद्दीने, कौशल्याने, हुशारीने, मेहनतीने घडतो. एवढय़ा मोठय़ा फापटपसाऱ्यात स्वत:च्या अस्तित्वाचा बिंदू तयार करणं सोपं नसतं. डॉमिनोजच्या तीन ठिपक्यांनी आपलं अस्तित्व केवळ निर्माण केलं नाही तर पसरवलं.

कांदा, टोमॅटो, वाटाण्याची मोठी आवक चाकण बाजार समितीत ५ कोटींची उलाढाल

■ चाकण

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये टोमॅटो, कांदा व वाटाण्याची विक्रमी आवक झाली. फळभाज्यांच्या बाजारात बटाटा व लसणाचे भाव तेजीत राहिले आहेत. कांद्याची उच्चांकी आवक होऊनही भाव स्थिर राहिले. जळगाव भुईमुग शेंगा व बंदुक भुईमुग शेंगांची काहीच आवक झाली नाही. पालेभाज्यांच्या बाजारात मेथी, कोथिंबीर, शेपू व पालक भाजीची भरपूर आवक झाली. जनावरांच्या बाजारात शेळ्या - मेंढ्यांच्या संख्येत घट होऊन त्यांचे भाव स्थिर राहिले . जर्शी गाई, बैल व म्हशींच्या संख्येत वाढ झाली. एकूण उलाढाल ५ कोटी, २० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १८,००० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ७ हजार क्विंटलने वाढल्याने कांद्याचा कमाल भाव १,३०० रुपयावर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक ८५० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक ९०० क्विंटलने घटल्याने भावात १०० रुपयांची वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव १,४०० रुपयांवरून १,५०० रुपयांवर पोहोचला. लसणाची एकूण आवक ४० क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक स्थिर राहून भावात १,००० रुपयांची वाढ झाली. लसणाचा कमाल भाव ७ हजार रुपयांवरून ८ हजार रुपयांवर पोहोचला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३९५ क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक स्थिर राहिली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

मोफत बस पाससाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ पिंपरी

पिंपरी - चिंचवड महापालिके मार्फत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी शहर हद्दीमध्ये राहणाऱ्या एड्स बाधित व्यक्तींना पीएमपीचा मोफत बस पास व जुन्या पासचे नूतनीकरण करून देण्यात येणार आहे. यासाठी एड्स बाधित व्यक्तींनी ३० मार्चपर्यंत अर्ज जमा करावेत, असे आवाहन पालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. शहरातील रहिवाशी असलेल्या एड्स बाधित व्यक्तींना प्रवासासाठी पीएमपीचा बस पास मोफत देण्यात येतो. या मोफत बस पाससाठी एड्स बाधित व्यक्तींनी ३० मार्चपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पिंपरीतील कै. नारायण मेघाजी लोखंडे कामगार भवन येथे अर्ज जमा

करावा. अर्जाबरोबर आधारकार्ड झेरॉक्स प्रत, एड्स बाधित असल्याचे शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा कार्ड, मतदान ओळखपत्र जमा करावे, असे आवाहन समाज विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांची चाकणमध्ये निदर्शने

■ चाकण

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या वरील खासदार अपात्रता कारवाईच्या निषेधार्थ काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. चाकण (ता.खेड) येथे शनिवारी रस्त्यावर उतरून तीव्र निदर्शने करून केंद्र सरकारच्या विरोधात आक्रमक घोषणाबाजी करण्यात आली.

या घोषणाबाजीने चाकण मधील माणिक चौक परिसर दणाणून गेला. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय डोळस यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात काँग्रेसचे अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष जमीर काझी, वंदना सातपुते, सतीश राक्षे, निलेश कड, चंद्रकांत गोरे, गीताबाई मांडेकर, आनंद गायकवाड, अमोल दौंडकर, गणेश शहाणे, अमोल जाधव, मयूर आगरकर, निखील थिगळे, सुनील मिंडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. सायंकाळी चाकण मधील माणिक चौक भागात चाकण आणि खेड तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संखेने एकत्र जमले. राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या विरोधात काँग्रेसकडून जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने खेड तालुका व शहर काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त देखील यावेळी तैनात करण्यात आला होता.

CORRIGENDUM NOTICE

This is with reference to the advertisement published in Maharashtra Times & Times of India on 09/10/2021 for the redevelopment of Pushpagandha CHS Ltd., situated on Plot Bearing F.P. No. 923 of Mahim TPS IV, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400025. The said Tender Document is extended by 15 days commencing from Monday, 27th March 2023. Last date to purchase the Tender Document (for Rs. 10000/- non-refundable) is Monday, 10th April 2023. Submission date of sealed offers from interested Developers is Tuesday, 11th April 2023 between 11am to 6pm at residence of Mr. Pramod P Godbole (Chairman) flat no. 12 A, Pushpagandha CHS Ltd.

रेशन दुकानदारांनी शासनाच्या सूचनेला दाखवली केराची टोपली

■ मुंबई

सरकारमान्य रेशन दुकानांतून कार्डधारकांना दरमहा विक्रीचे गहू-तांदूळ मोफत दिले जाणार

आहेत, असे सूचना फलक दुकानांवर लावण्याचा आदेश शासनाच्या अन्न पुरवठा विभागाने जारी केला आहे. मात्र सूचनेला परिमंडळ ड शिधावाटप क्षेत्रातील अनेक दुकानदारांनी केराची टोपली दाखवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. केशरी रंगाच्या शिधा पत्रिकाधारकांना गेल्या महिन्यापासून गहू-तांदूळ मोफत दिला जात आहे. त्यासाठी कार्डधारकाला पैसे मोजावे लागणार नाहीत. याची माहिती कार्डधारकांना व्हावी यासाठी प्रत्येक रेशन दुकानदारांनी प्रथम दर्शनी ठळक अक्षरात सूचना फलक लावण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, असे असताना येथील काही दुकानदारांना सूचना फलक लावण्याचा विसर पडला आहे की, जाणीवपूर्वक लावले गेले नाहीत? याचा शोध परिमंडळ ड कार्यालयाने घेणे गरजेचे आहे.

रावसाहेब दानवेंचे जावई हर्षवर्धन यांचा बीआरएस पक्षामध्ये प्रवेश

■ हैद्राबाद

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचे जावई माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षात प्रवेश केला. हैदराबादमध्ये जाऊन त्यांनी चंद्रशेखर राव यांची भेट घेतली आणि त्यांच्या पक्षात प्रवेश केला. दरम्यान जे मनसे आणि शिवसेनेत राहू शकले नाहीत ते बीआरएसमध्ये काय राहणार अशी टीका त्यांचे विरोधक करीत आहेत. वडील स्व. रायभान जाधव, आई तेजस्वीनी जाधव यांच्याकडून राजकीय वारसा मिळालेले हर्षवर्धन यांनी आपला राजकारणातील श्रीगणेशा जिल्हा परिषदेपासून केला. सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिकेत राहिलेल्या जाधव यांना कन्नड तालुक्यातील मतदारांनी एकदा नव्हे तर दोनदा विधानसभेवर पाठवले. एकदा मनसेकडून तर दुसऱ्यांदा शिवसेनेच्या तिकिटावर. पण सातत्याने वाद ओढवून घेणाऱ्या जाधव यांचे बस्तान एका पक्षात

कधी बसलेच नाही. मनसेचा राजीनामा दिल्यानंतर शिवसेनेत प्रवेश केला, पण पक्षाचे कार्यक्रम, मेळावे, बैठका यांना ते कधीच हजर नसायचे. जिल्ह्यातील कुठल्याही नेत्याला ते जुमानायचे नाही, आपल्या मतदारसंघाचे आपणच राजे, असे ते नेहमी सांगायचे. त्यामुळे पक्षात असून नसल्यासारखी त्याची गत होती. जिल्ह्यातील नेत्यांशी देखील त्यांचे खटके उडायचे. आता त्यांनी बीआरएस मध्ये प्रवेश केला आहे.

गोडोलीत भैरवनाथ यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ सातारा

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गोडोली गावच्या भैरवनाथाची यात्रा सुरु झाली आहे. २५ ते २९ मार्च या दरम्यान होणाऱ्या यात्रेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती देवस्थानचे मानकरी नगरसेवक शेखर मोरे-पाटील यांनी दिली. गोडोलीकरांनी या संपूर्ण कार्यक्रमात उपस्थित राहवे असे आवाहनही करण्यात आले आहे.

भैरवनाथचा पहिला छबिना शनिवार, २५ मार्च तर दुसरा छबिना २६ मार्च रोजी रात्री आठ वाजता झाला आहे. या छबिन्यात श्री पालखीची ग्रामप्रदक्षिणा आणि छबिन्यामध्ये विविध विषयांवर आधारित पारंपरिक वाद्य आणि मर्दानी खेळ होणार असल्याचे भैरवनाथ देवस्थान यात्रा कमिटीने दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे. २७ मार्च रोजी काही नामांकित लोकनाट्ये, तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. २८ मार्च रोजी कुस्तीच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी दोन लाखांचे बक्षिस ठेवण्यात आले आहे. सुप्रसिद्ध मल्ल पैलवान योगेश दोडके यांच्या उपस्थितीत या स्पर्धा होणार आहेत.

TENDER NOTICE
"IBERIS CHS LTD".
Situated at Bldg. No. 5 & 6, Cosmos Park, Opp. Suraj Water Park, Ghodbunder Road, Thane (W) 400 615
Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.
Tender can be collected from Consultant Office.
From: **27/03/2023 to 01/04/2023.**
Between **11.00 Am To 5.00 Pm**
Date of Submission on **01/04/2023 & 02/04/2023 (up to 5.00 PM)**
at **IBERIS CHS Ltd** Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted
STAR ASSOCIATES
ISO Certified Company
Consulting Engineers
Office Address: B.O. Shop No.2, Bldg. No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (E), Thane - 401 107.
Tel. Office. 022 2855 4093 / 98208 18155
Tender Cost Rs. 4000/- in Cash (Non Refundable)

महिलांसाठी बचत गट मेळाव्याचे आयोजन

■ पिंपरी

लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशन मोशी व पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने मोशी येथील जय गणेश लॉन्स भारत माता चौक येथे जागतिक महिला दिन निमित्ताने महिलांसाठी भव्य बचत गट मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चिंचवड शाखा व्यवस्थापक सोनाली हिंगे यांनी बँकेच्या महिला बचत गटांसाठीच्या कर्ज योजना बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत महिलांसाठींच्या नवीन उद्योग व्यवसायासाठी असणाऱ्या योजनांचे मार्गदर्शन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी शशिकांत कुंभार यांनी केले. पिंपरी चिंचवड मनपाच्या महिला बालकल्याण व इतर कल्याणकारी योजनांबाबतचे मार्गदर्शन मनपाच्या समूह संघटिका कीर्ती वानखेडे व जयश्री पवळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित गव्हाणे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पन्हाळ्यात गव्याच्या हल्ल्यात माजी उपसरपंच जागीच ठार

■ कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळा तसेच शाहूवाडी या दुर्गम भागात गव्यांचा धुमाकूळ सुरूच आहे. गव्याच्या हल्ल्यात एक शेतकरी गंभीर जखमी झाल्याची घटना समोर असतानाच पन्हाळा तालुक्यात गव्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.

शेतात वैरण आणण्यासाठी जात असणाऱ्या पन्हाळा तालुक्यातील कसबा ठाणे येथील माजी उपसरपंच माणिक बळवंत पाटील या शेतकऱ्यावर गव्याने हल्ला केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

रविवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास म्हारकी नावाच्या शेतात जनावरांना वैरण आणण्यासाठी जात असताना गवा मक्क्याच्या शेतात उभा होता. यावेळी गव्याने माणिक पाटील यांच्यावर हल्ला केला. गव्याच्या हल्ल्यात थेट छातीत शिंग घुसल्याने ते जागीच ठार झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. गेल्या काही महिन्यांपासून कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात गव्यांचा मानवी वस्तीत प्रचंड वावर वाढला आहे.

कोकण मंडळाचा कासवगती कारभार भुई भाडे भरणाऱ्या रहिवाशांची फरफट

■ मुंबई

निवासी घरांसाठी वापरत असलेल्या भुई भाड्याची रक्कम (शुल्क) भरण्यासाठी वांद्र्यातील म्हाडा कोंकण गृहनिर्माण मंडळाच्या कार्यालयात महिनाभरापासून चकरा मारूनही प्रतिसाद मिळत नाही.

म्हाडा कोंकण गृहनिर्माण मंडळाने सन् १९८८ साली कर्जत अलिबाग, पनवेल, खोपोली येथील मोकळे भूखंड लॉटरीच्या माध्यमातून लाभार्थ्यांना घरे बांधण्यासाठी ३० वर्षांच्या भाडे पट्टीवर दिले आहेत. शेकडो रहिवाशांनी सोसायट्या बनवून स्वखर्चाने येथे घरे बांधली आहेत. म्हाडा दरवर्षी या रहिवाशांकडून भुई भाडे घेते. आता ३१ मार्च जवळ आल्याने ही मुदत संपणार आहे. ही रक्कम भरण्यासाठी येथील रहिवासी कोसो दूर वरून म्हाडा कार्यालयात चपला झिजवत येत आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांकडून ढोबळ कारणे देऊन भाडे घेण्यास विलंब होत आहे, असा आरोप रहिवासी करत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका
घन कचरा व्यवस्थापन पी / दक्षिण विभाग
स्वारस्य अभिव्यक्ती

सहाय्यक आयुक्त **पी/ दक्षिण विभाग, पी / दक्षिण विभागात मॅनिंग आणि मॉपिंग योजना अंतर्गत दि. १७ एप्रिल, २०२३ ते दि. १६ ऑक्टोबर,** २०२३ या पुढील ०६ महिन्याच्या कालावधीसाठी पी / दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील इच्छुक संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर अथवा पी / दक्षिण विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर अथवा सहा.अभि. (घकव्य) पी / दक्षिण विभाग यांच्याकडे संपर्क साधावा.

अर्ज तसेच कामाच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी / दक्षिण ह्यांच्या कार्यालयात रु.२०००/- अधिक १८% जीएसटी रोखीने **दि. २७ मार्च, २०२३ ते दि. ०३ एप्रिल, २०२३** पर्यंत सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत विकत मिळतील.

संस्थेने सहा.अभि.(घकव्य) पी / दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **दि. ०५ एप्रिल, २०२३** (दुपारी २:०० वाजेपर्यंत).

सही/-
पीआरओ /३२०६/जाहि./२०२२-२३ **सहाय्यक आयुक्त (पी/दक्षिण)**

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

चंदेरी च्वींगम

प्रेम म्हणजे दोन जीवांचे मिलन. जणू स्वर्गात बांधल्या गेलेल्या रेशीमगाठीच. पण क्षणात त्यांच्या आयुष्यात तिसरा आला तर? अशी अकल्पित प्रेमकथा असलेला 'सरी' हा चित्रपट येत्या ५ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. तत्पूर्वी या चित्रपटामधील प्रमुख भूमिकेत असलेल्या कलाकारांचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून मालिकेतून घराघरात पोहोचलेला अजिंक्य राऊत, विविध चित्रपटांतून तरूणांच्या हृदयचा ठाव घेणारी रितिका श्रोत्री आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता पृथ्वी अंबर यांच्या प्रेमाचा त्रिकोण या पोस्टरमध्ये दिसत आहे. आता यांचे प्रेम त्यांना आयुष्याच्या कोणत्या वळणावर नेणार हे पाहणे रंजक ठरणार आहे. 'लाईफ इज फुल्ल ऑफ सरप्राइज अँड मिऱ्याकल्स.' अशी या प्रेमकथेची टॅगलाईन आहे. या चित्रपटाचे लेखन, संकलन दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील नामवंत दिग्दर्शक अशोका के. एस. यांनी केले आहे.

अजिंक्य राऊत - रितिका श्रोत्री 'सरी'मध्ये झळकणार

'स्वामी माझी आई' म्युझिक व्हिडीओ प्रकाशित

भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या आणि 'भिऊ नकोस... मी तुझ्या पाठीशी आहे', असे अभिवचन भक्तांना देणाऱ्या श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन नुकताच संपन्न झाला. स्वामींचा आभास सदैव सोबत असतो, परंतु सहवास नेहमी असेल की नाही सांगता येत नाही म्हणून तर आई आणि आईची माया, आईची साथसोबत त्यांनी प्रत्येकासोबत जोडली. स्वामींच्या प्रकट दिनाचे औचित्य साधून 'स्वामीरुपी' 'आई'ची महती सांगणाऱ्या 'स्वामी माझी आई' या मराठी म्युझिक व्हिडीओची निर्मिती 'आनंदी वास्तू'ने केली आहे. आई केवळ पोटातून जन्म देणारी किंवा रक्ताचे नाते नसून आई ही ईश्वराचा अंश असते. आपला सांभाळ करणारी, मायेने खाऊ घालणारी, आयुष्याला योग्य वळण देणारी, संस्कार घडवणारी व्यक्ती म्हणजेच आई 'स्वामी माझी आई' या मराठी म्युझिक व्हिडीओच्या माध्यमातून अशाच 'स्वामीरुपी आई' ह्या भावनेचं दर्शन घडणार आहे. 'स्वामी माझी आई' या म्युझिक व्हिडीओची निर्मिती 'आनंदी वास्तू' यांनी केली असून ओंकार हनुमंत माने यांचे लेखन -दिग्दर्शन आहे.

झी मराठी वाहिनीवर 'चंद्रविलास' ही एक रहस्यमय भयकथा २७ मार्चपासून रात्री ११ वा. भेटीला येणार आहे. यात मुख्य भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री **आभा बोडस** हिच्यासोबत केलेली बातचीत....

वाड्यात शूटिंग करायला मजा येतेय

चंद्रविलास ह्या मालिकेबद्दल काय सांगशील?

ह्या मालिकेबद्दल सांगायचं झालं तर 'चंद्रविलास' ही एक भयपट मालिका आहे. चंद्रविलास एक वास्तू आहे, एका वाड्याचे नाव आहे आणि ह्या वाड्यात मी साकारत असलेली व्यक्तिरेखा म्हणजेच शर्वरी महाजन आहे.

तुझ्या भूमिकेबद्दल काय सांगशील?

मी शर्वरी महाजन ही व्यक्तिरेखा साकारत आहे. शर्वरी महाजन एक सोळा वर्षांची मुलगी आहे. आणि तीच बाबांवरती खूप प्रेम आहे. ती स्वभावाने अतिशय नम्र आणि चांगली आहे. तिला दुसऱ्याना झालेला त्रास कळतो, तिला ते बघवत नाही. तिच्यासाठी तिचे वडील सर्वस्व आहेत, तिला त्याच्यामध्ये एक मित्र सुद्धा दिसतो. बाबांना काही झालं तर त्याचा जास्त त्रास तिला होतो. ती खूप जिज्ञासू मुलगी आहे. ती आणि तिचे वडील त्या वाड्यात काही आपत्कालीन परिस्थितीमुळे अडकतात आणि त्यानंतर अशी परिस्थिती उद्‌भवते ज्याचा तिला त्रास होतो. पण त्या प्रसंगातून ती बाहेर येते. आणि तिचे बाबा तिला कश्या प्रकारे मदत करतात हे या मालिकेत दर्शविला गेल आहे.

तुझ्या सहकलाकारांबद्दल काय सांगशील?

या मालिकेत माझ्या बाबांच पात्र ते म्हणजे सागर देशमुख सर. मी त्यांना ऑफस्क्रीन पण बाबाच म्हणते. आमचं ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन बॉण्डिंग खूप छान आहे. खरे सांगायचे तर मला सागर सरांकडून खूप काही शिकायला मिळते. मला संपूर्ण टीमसोबत काम करायला खूप आवडते.

तुझा आतापर्यंतचा प्रवास कसा होता?

मी २०१४ मध्ये माझ्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर मी दोन चित्रपटांमध्येही काम केल आणि काही मालिका आणि आता खूप दिवसांनी मी ही मालिका करत आहे आणि मला या मालिकेच्या सेटवर म्हणजे या वाड्यात शूटिंग करायला मला खूप मजा येत आहे. आमचा वाडा पाहण्यासारखा आहे.

कबुतरे आणि आजार

मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या शहरांमध्ये मोठ्या संख्येने आढळून येणारा पक्षी म्हणजे ही कबुतरे (पारवे). मुंबईसारख्या महानगरात तर चौकाचौकात कबुतरखाने आढळून येतात. पण या कबुतरांमुळे लोकांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं याची कुणाला कल्पनाही नसेल. कबुतरांपासून सामान्यांना होणारा संसर्ग वाढला. लोकांमध्ये श्वसनाचे विकार वाढल्याचा इशारा डॉक्टर सातत्याने देत असूनसुद्धा त्याकडे कानाडोळा करण्यात धन्यता मानण्यात येते. मुंबई तसेच ठाण्यात हवेत आर्द्रता जास्त असल्याने आणि कबुतरांची संख्यासुद्धा खूप असल्याने कबुतरांची विष्ठा आणि पिसांमुळे होणाऱ्या आजारांचे रुग्ण आढळून येतात. गेल्या काही काळात राज्यातील जवळपास सर्वच शहरी तसेच निमशहरी भागात कबुतरांचा उच्छाद पाहावयास मिळत असून, ही कबुतरे आता लोकांच्या जीवावर उठली असल्याचे चित्र दिसते. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, कबुतरांच्या विष्ठेत बुरशी आणि जीवाणू असतात. त्यामुळे लोकांच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.

तुम्ही 'दिलवाले दुल्हनियाँ ले जायेंगे' या सिनेमातील शाहरुख खान सारखे कबुतरांना 'आओ....आओ ' करत खाऊ घालत असाल (खाऊ घालताना आओ... आओ म्हणत नसाल तरीही बरं का) आणि तुम्ही पुण्यात किंवा ठाण्यात राहात असाल तर तुम्हाला किमान ५०० रुपयांचा दंड होऊ शकतो. हो! हो! तुम्ही बरोबर वाचलंत. कारण आता कबुतरांमुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या महापालिकांनी ही कारवाई करण्याचे ठरवले आहे. का घ्यावा लागला असेल त्यांना हा निर्णय? तर याचे सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही कबुतरे आता अनेक आजारांना निमंत्रण देत आहेत. याबाबत आज आपण याविषयी अधिक माहिती घेणार आहोत...

कबुतरांची घातक विष्ठा आणि अनेक आजार

- कबुतरांच्या विष्ठेत असणाऱ्या असंख्य जंतूंमुळे माणसांना जवळपास ६० प्रकारचे आजार होतात.
- कबुतरांपासून १०० मीटर परिघातील व्यक्तींना त्यांच्या ' पिजन droppings' (विष्ठा आणि पिसे) चा त्रास होतो.
- कबुतरांच्या विष्ठेमुळे लोकांना अस्थमाचा जास्त त्रास होतो.
- इतर पशू पक्षी हे दाणे आणि नैसर्गिक खाद्य खात असल्याने त्यांच्या मलमूत्र यातून संसर्ग होत नसतो आणि ती विष्ठा खत म्हणून झाडाला पूरक असते. कबुतर देखील शाकाहारी असते. मात्र कबुतर, वटवाघूळ गिधाड, तरस आणि कोमोडो ड्रॅगन यांची लाळ आणि विष्ठा आम्लयुक्त आणि घातक असते.
- कबुतरांची विष्ठा आम्लयुक्त असते. त्यामुळे छत खराब होऊन लिकेज देखील होऊ शकते.
- इतर पक्षी प्राणी हे पाणी आणि माती Mud Bath याची आंघोळ करतात म्हणून ते स्वच्छ असतात, पण कबुतर हे फार गलिच्छ आहे. त्यामुळे रोग संकर पूर्ण अंगभर घेऊन ते वावरत असते. काळ्या रंगाच्या पिसवा कबुतर विष्ठेतून निर्माण होतात. त्या सुईच्या टोकापेक्षा सूक्ष्म असतात.
- आपल्या सोसायटीच्या परिसरात अथवा अन्य ठिकाणी असलेल्या कबुतरांमुळे सर्वांना त्रास होतो असेही नाही. ज्यांची रोगप्रतिकारकशक्ती कमी असते त्यांना फुफ्फुसात संसर्ग होतो. कबुतरांच्या विष्ठेमुळे फुफ्फुसांच्या शिवाय इतर अवयवांना फारसा धोका नसतो हे जरी खरे असले तरी हा धोका जीवघेणा ठरू शकतो.
- 'अक्यूट हाइपर सेंसिटिव्हिटी न्यूमोनाइटिस' हा गंभीर आजार कबुतरांच्या विष्ठेतील जंतूंमुळे होतो. कबुतरांच्या विष्ठेतील जंतू फुफ्फुसाच्या ऑक्सिजन घेणाऱ्या वायुकोषाबाहेरील आवरणाला सूज निर्माण करतात. त्यामुळे वायुकोषात ऑक्सिजन घेण्याचे प्रमाण कमी होऊन दम लागायला लागतो. शिवाय अशक्तपणा, कोरडा खोकला, ताप, पोटशूळ, सहजच घाम येणे, अंगाला सूज येते जाते हीही लक्षणे दिसतात. लवकर उपचार न घेतल्यास फुफ्फुसे पूर्ण निकामी होतात आणि फुफ्फुसे प्रत्यारोपण करण्याचा पर्याय फक्त उरतो. विशेष म्हणजे या आजाराचे लवकर निदान होत नाही.
- कबुतरांच्या विष्ठेत अस्परजिलस आणि क्रायटोकॉकस बुरशी आढळून येते. कबुतरांची विष्ठा पडलेल्या मातीत ही बुरशी सापडते. ती मानवी आरोग्यास धोकादायक असते. यामुळे ॲलर्जी होऊ शकते.
- दम्याचे रुग्ण आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना 'हिस्टोप्लास्मोसिस' नावाचा आजार होऊ शकतो. या आजाराची डोके दुखणे, ताप, कोरडा खोकला, सुस्ती येणे अशी फ्ल्यू सदृश्य लक्षणे दिसतात.

अशी घ्या काळजी

कबुतरांचा कचरा, विष्ठा मानवासाठी हानीकारक असू शकतात. म्हणूनच कबुतरांची विष्ठा साफ करताना खूप सावधगिरी बाळगली पाहिजे.

साफसफाई करताना फक्त हातमोजेच नाही तर मास्क, कव्हर शूज आणि पँट आणि पूर्ण बाह्यांचा टॉप घालूनच स्वच्छ करा.

ज्यांची प्रतिकारशक्ती कमी असलेल्यांनी कबुतरांची विष्ठा साफ करू नये.

बाल्कनीत कबुतरं येऊ नये यासाठी काही खास उपाय

१) कबुतरांना व्हिनेगर आणि बेकिंग सोड्याचा वास अजिबात आवडत नाही. त्यामुळे या दोन गोष्टींचे मिश्रण करून बाटलीमध्ये स्प्रे तयार करा आणि ज्या ठिकाणी कबुतरे येतात त्या ठिकाणी फवारणी करा.

२) कबुतरांना दालचिनीचा वासही आवडत नाही. त्यामुळे पाण्यात दालचिनी टाकून उपाय तयार करा आणि तुमच्या बाल्कनीमध्ये शिंपडा.

३) माळे, पोटमाळे, वळचणीच्या जागा इथे कबुतरे वास्तव्य करणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे.

- फ्लॅटच्या खिडकीखाली ग्रिलमधे एसीच्या duct unit च्या आजुबाजूस कबुतरे निवास करतात आणि दुर्लक्षित कबुतरे अंडी पिल्ले काटक्या विष्ठा यात राहतात.
- एसीमधून जी हवा घरात येते त्यातून सुकलेल्या विष्ठेमधील सूक्ष्मजंतू युक्त धूळ घरात येते
- कबुतर उडते तेव्हा ही विष्ठा धूळ एसीच्या बाहेरच्या outlet च्या मागच्या बाजूने जाळी मार्गे आतमधे जाते आणि तेथून आत येणाऱ्या पाईपमधून हे जंतू बंद एसीतून आत प्रवेश करतात.
- खिडक्या घट्ट बंद असतील तरी जंतूसंसर्ग होतोच. हे जंतू पाणी, फिनेल, सिड, डेटॉल यामधेही जिवंत राहतात.

४) सगळ्यात सोपा उपाय म्हणजे बाल्कनी असेल तर पिजन नेट लावून घ्या.

हे सगळे उपाय असले तरी ते तात्पुरते आहेत. त्यामुळे शक्यतो कबुतर आसपास वास्तव्य करणार नाही हाच यावर एक जालीम उपाय आहे. त्यामुळे 'दिलवाले दुल्हनियाँ ले जायेंगे' मधील शाहरुख सारखे 'कबुतरांना' आओ... आओ' म्हणून खायला निमंत्रण देऊन अनेक आजार ओढावून घेण्यापेक्षा 'मैने प्यार किया'मधील भाग्यश्री सारखे 'जा जा ... कबुतर जा जा' असे म्हणत या कबुतरांपासून चार हात लांब राहिलेलेच बरे. नाही का?

हेल्दी Me

(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)

उन्हाळ्यात अशी घ्या काळजी

उन्हाळा म्हटला की जीव अगदी नकोसा होतो. त्यात आता फ्ल्यू साररव्या संसर्गजन्य आजारांनी पुन्हा डोके वर काढले आहे. उन्हाळ्यात देखील पाऊस पडत आहे. अशा वेळी प्रत्येकाने आपली काळजी घेतली पाहिजे. खालील काही उपाय केले तर उन्हाळा सुसह्य व्हायला मदत होईल..

शरीरातील पाणी वाढवा - उष्णतेमुळे शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते. म्हणून काळजी घ्या. नाहीतर उष्णतेचे अनेक विकार सुरू होतील.

उपाय-

१) नियमित प्राणायाम करा. उष्णतेचा त्रास कधीच होणार नाही. २) अनुलोम विलोम जास्तच करा. शरीराचे तापमान स्थिर राहील. ३) उजवी नाकपुडी बंद करून डावी नाकपुडी जास्तच वेळ चालू ठेवा. कारण ती चंद्रनाडी आहे. त्यामुळे शरीरात गारवा तयार होईल. ४) उजव्याच कुशीवर जास्त वेळ झोपा. त्यामुळे डावी नाकपुडी आपोआप जास्त वेळ चालू राहील. ५) हलकाच आहार घ्या. पोट साफ ठेवा. पित्त वाढवू नका. ६) माठातीलच थंड पाणी अगर कोमट पाणी बसून सावकाश चवीचवीने प्या. घटाघटा नाही. ७) पेयामध्ये बर्फ वापरू नका. बर्फ गरम आहे. ८) आवळा/कोकम/लिंबू/मठ्ठा/ताक इ. सरबत जरूर प्या. ९) सकाळी उठल्यावर लगेच १ ते २ ग्लास कोमट पाणी प्या. १०) प्रत्येक काम सावकाशच करा. ११) जेवतेवेळी मधे मधे १/२ वेळा थोडे पाणी प्यावे.

१२) उन्हातून आल्यावर गूळ पाणी पिणे. १३) खडीसाखर सोबतच ठेवून थोडी थोडी खावणे. १४) जिरेपूड १ चमचा+खडीसाखर १ चमचा व १ ग्लास ताकातून रोज पिणे. उष्णता वाढणार नाही. १५) दुपारच्या जेवणात रोज पांढरा कांदा जरूर खावणे. १६) रात्री झोपण्यापूर्वी खोबरेल तेल तळपायांना चोळणे व बेंबीत घालणे. तसेच देशी गाईचे तूप नाकात घालणे. १७) उन्हापासून शरीराचे रक्षण करा. बाहेर जाताना टोपी, छत्री, गॉगल वापरा. १८) बाहेर जाताना चांगल्या प्रतीचे सन स्क्रीन लोशन लावायला विसरू नका. १९) ज्येष्ठ व्यक्तींनी उन्हाळ्यात उन्हात बाहेर फिरणे, लांबचे प्रवास, जास्त श्रम टाळावे. पातळ पचायला हलका आहार नाचणीची खीर, मऊ भात तूप, मुगाची खिचडी असा घ्यावा. पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ घ्यावे. रात्रीचे जेवण लवकर करावे. २०)उन्हाळा आणि परीक्षा यांचे जणू समीकरणच आहे परीक्षांमुळे मुलं रात्री जागरण करून अभ्यास करतात. त्याचा परिणाम म्हणजे पित्ताचा त्रास वाढतो आणि ऐन परीक्षेच्या वेळेस तब्येत बिघडते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जागरण टाळावे. सकाळी लवकर उठून अभ्यास करावा. परीक्षेला जाण्यापूर्वी मऊ भात, गूळ तूप पोळी असा साधा, पण पोटभरीचा आहार घ्यावा. उन्हातून जाताना लिंबू सरबत, कोकम सरबत बरोबर ठेवावे. त्यामुळे परीक्षेला पित्ताचा त्रास होणे, चक्कर येणे या गोष्टी टाळता येतात.

संकलन - अश्विनी मेढी-घाटपांडे

नवाकाळ शब्दकोडे-४८६



आडवे शब्द –

१. लोकात न मिसळणारा, मैत्री न करू शकणारा ५. सोयरा, आप्त ७. नौबत ९. पत्नी, बायको ११. पौराणिक काळातील एक यज्ञ १२. पराभव, माळ १३. विश्वास १५. यातून झाड उगवते १६. चप्पल १९. प्रघात २१. सत्कर्माचे फळ २४. संतापाची नजर २६. अंगीकार २७. लता, वल्लरी २८. पिशाच्यांच्या कथित लीला ३०. पिठूळ ३२. निकष न लावता केलेली निवड ३५. नाष्ट्याचे स्वस्त पदार्थ व फास्ट फूडस् रस्त्यावर मिळण्याचे ठिकाण ३८. चोळीचे कापड ३९. काया ४१. मोदक, समोसा, करंजीचे आवरण ४३. सूक्ष्म तपशील ४५. कुबड ४६. पौर्णिमा ४८. नशा, धुंदी ४९. चमक ५१. रिंगण, वर्तुळ ५२. कौतुकास्पद, अभिमानास्पद ५३. कार्य, कृत्य ५४. हेतू ५५. मिश्रण, खिचडी ५६. जंगल ५७. व्यवसाय ५८. गोणपाट ६०. संदेह ६२. अमर्याद ६३. दुधाचा प्रसिद्ध बेळगावी पदार्थ, मुलींचे एक नाव ६४. विस्मय ६६. लाकडी फळ्यांचे छत, तख्तपोशी ६८. अतिशय मोठा लाभ ७०. आसरा ७२. तळे, छोटा जलसाठा ७३. लोचट ७४. आमंत्रितांना दिलेले जेवण, पार्टी ७७. मोठा धनलाभ, ज्योतिषातील एक मुहूर्त ७८. प्रतिबंध ७९. एकाच व्यक्तीच्या हातात राज्याची सत्ता एकवटणे ८२. हत्ती हाकणारा ८४. फुलणे ८६. कंडू ८७. मोह ८८. शेतीचे एक अवजार ९०. विल्हेवाट ९१. शैली ९३. हात ९४. उद्दिष्ट ९५. कुंकवाची आडवी रेघ ९६. रहस्य, गुपित ९७. शरीर ९८. कॅश, रोकड १००. कणसे बडवण्याचे लाकडी अवजार, मोठा लाकडी हातोडा १०१. दारू १०३. घोड्याचे पाऊल १०४. निकाल, शेवट १०५. लाडिक १०६. बभ्रा, मोठी चर्चा

उभे शब्द –

१. पिंपळ २. श्रीकृष्णाचे एक नाव ३. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड ४. कावळ्यापेक्षा थोडा मोठा पक्षी ५. स्वतःचा रंग बदलू शकणारा प्राणी ६. नगर ८. ताब्यात घेतलेले १०. यौवन १४. मैना, बासरी, राजकुमारी १७. हाक १८. पूर्वायुष्यात केलेले गैरव्यवहार, भानगडी २०. उत्तराधिकारी २१. रोमांच २२. वखवखलेला, अधाशी २३. अंगणाचे दार २५. श्रम २६. स्वतःचे, वैयक्तिक २७. जनावराच्या नाकातली नियंत्रक दोरी २९. बंधू ३१. पुरुष ३३. वॉचमन, राखणदार ३४. भयभीत, घाबरलेला ३५. चहाबरोबर खाता येणारा बेकरीतला खुसखुशीत पदार्थ ३६. केळवण ३७. ताकद ४०. घुंगरू ४१. शेतकऱ्यांना पावसाची चाहूल देणारा पक्षी ४२. कमी वजनाचा ४३. शिल्लक ४४. भांबावलेला ४७. अननुभवी ५०. पोटापाण्याचा उद्योग ५२. हिमालयातील एक शिखर, रुद्राक्षविशेष ५५. करंजी ५६. धडा शिकवणे ५९. दातृत्व ६१. काटकी ६२. द्वीप ६३. दर बारा वर्षांनी येणारा एक धार्मिक सोहळा ६५. त्वरित ६७. ठक, लुच्चा ६९. डिंकाचा घरगुती पर्याय ७०. वरचढ ७१. नुकसान ७३. खोटारडा, अविश्वासू ७५. चुलती ७६. कोकिळेचे गाणे ७८. पिकांची टक्केवारी ७९. चमचेगिरी ८०. राजवाडा ८१. बछडा ८३. मुक्काम ८५. शोक ८९. वस्ती, कॉलनी ९२. शेतकरी ९३. झेंडा ९५. दलदल, राडा ९६. मोठ्या आकाराचा काळा विंचू ९९. मदतीसाठी देवाला मारलेली हाक १०१. गंमत, मौज १०२. दीपक •

नवाकाळ कोडे क्रमांक ४८५ चे उत्तर

आडवे शब्द : १. बलाकमाला ५. अंदाजे ८. तमोहर ११. कूप १२. मात १४. अरण्यरुदन १६. तोंड १८. मंदोदरी १९. नक्राश्रू २०. तोलामोलाचा २३. रोटी २५. घड्याळ २७. खोच २८. गोडीगुलाबीने ३०. घोट ३१. चमकी ३२. कथिल ३४. कराटे ३६. उरक ३९. मंगल ४०. तपमापक ४१. घावन ४३. निग्रह ४५. राणा ४६. अटकाव ४७. सनातनी ५०. प्राणी ५१. सनद ५३. सह ५४. चिंतन ५५. माय ५६. गलथान ५९. जड ६०. जुने ६१. पर्जन्य ६२. एडका ६३. मसूर ६४. साखर ६६. कीटक ६८. जहर ७०. हलके ७३. पचका ७५. सवाल ७६. ददात ७७. अक्राळविक्राळ ७८. लग ८०. डिंगरी ८२. तीर ८३. वीट ८४. वचा ८६. दोरा ८७. दाह ८९. भाट ९०. मग ९१. खबरबात ९३. परवानगी ९५. पायवाट ९७. जगदंबा ९८. लाख ९९. परत १००. परामर्श

उभे शब्द : २. लाकूडतोड्या ३. कप ४. लामा ६. दामोदर ७. खारफुटी ८. तरुणी ९. मोद १०. हनन १३. तमंचा १५. श्मश्रू १७. सुमो २१. लाळघोटेपणा २२. लाट २३. रोचक २४. भंगूर २५. घटक २६. भ्रामक २८. गोल २९. बीजगणित ३१. चरक ३३. थिटा ३५. रातराणी ३६. उपवन ३७. रवका ३८. अग्र ४१. घाटमाथा ४२. नवस ४३. निष्ठा ४४. हसतमुख ४८. नान ४९. नीटनेटका ५०. प्राध्यापक ५१. सय ५२. दगड ५३अ. हजरजवाबी ५५. मान्यता ५७. लकाकी ५८. नमक ६२. एकचक्रा ६४. सार ६५. रहदारी ६७. टपाल ६९. हल ७१. लत ७२. तक्रारदार ७३. पवित्र ७४. काळवीट ७६. दगलबाज ७७. अती ७९. गवगवा ८१. येरागबाळा ८५. शबनम ८८. हवाला ८९. भागी ९०. मयत ९२. तगडा ९३. पक्षी ९५४. नख ९५. पार ९६. टप

सावरकरांवरील टीका खपवून घेणार नाही उद्धव ठाकरेंचा राहुल गांधी यांना इशारा

पान १ वरून

आमच्या सरकारच्या काळात 'जे विकेल तेच पिकेल' असे धोरण राबविणार होतो. आमच्या सरकारच्या काळात आम्ही खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिलो. पण आताचे कृषीमंत्री अंधारात शेतीची पाहणी करतायत. जणू काही त्यांना दिव्यदृष्टी आहे. मालेगावमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये वस्त्रोद्योग असल्याने त्यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आमच्या सरकारने वस्त्रोद्योगाला वीजदरात सवलत दिली. बंद पडणाऱ्या वस्त्रोद्योगाला हात देऊन उभे केले. पण हे लोक सत्तेत आल्यापासून येथील उद्योग दुसऱ्या राज्यांमध्ये नेत आहेत. त्यांनी यावेळी भाजपवर प्रहार करताना ते म्हणाले की, तुम्ही मिंद्यांच्या नावाखाली निवडणूक लढवणार आहात का? हे एकदा जाहीर करा. भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी मिंद्यांना ४८ जागा दिल्या जातील, असे म्हटले आहे. अरे पण तुमच्या नावाप्रमाणे ५२ तरी जागा द्या, असेही ते उपाहासाने म्हणाले. त्याचबरोबर भाजपची १५२ कुळे जरी खाली आली तरी शिवसेना संपवू शकणार नाही. मोदींवर टीका करताना ते म्हणाले की, तुमचा नेता किंवा मोदी म्हणजे भारत नाही. त्यामुळे मोदींचा अपमान हा भारताचा अपमान कसा? असा सवालही त्यांनी केला.

आम्हाला सत्ता गेल्याचे दुःख नाही, पण आमचे सरकार गद्दारी करून पाडण्यात आले. ज्या आईने यांना राजकारणात आणले तिच्या कुशीत वार करून हे गेले. मी आजही त्यांना आव्हान करतो की, तुम्ही मोदींचा फोटो लावून निवडणूक लढवा, मी माझ्या वडिलांचा फोटो लावून निवडणूक लढवतो. पाहूया लोक कुणाच्या मागे उभे राहतात, असे आव्हान त्यांनी पुन्हा एकदा आपल्या भाषणातून भाजपा आणि शिंदे गटाला केले आहे.

उद्धव यांच्या सभेपूर्वीच नाशिकमधील पदाधिकारी शिंदे गटात

■ नाशिक

उद्धव ठाकरेंची सभा यशस्वी करण्यासाठी एकीकडे ठाकरे गटाचे कार्यकर्ते जोरदार तयारी करीत असतानाच, नाशिकमध्ये ठाकरे गटात मोठी फूट पडली. नाशिक महिला आघाडीच्या जिल्हा संघटकांसह १६ सरपंच आणि इतर अनेक पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. उद्धव ठाकरेंची आजची सभा खूपच महत्वाची मानली जात आहे. खासकरून नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कृषी मंत्री दादा भुसे यांनी ज्या पद्धतीने उद्धव ठाकरेंच्या पक्षावर टीका केली होती, त्याला आज उद्धव ठाकरे काय उत्तर देतात याकडे संपूर्ण नाशिक जिल्ह्याचे लक्ष आहे. त्यामुळेच ही सभा यशस्वी करण्यासाठी ठाकरेंचे निष्ठावंत कामाला लागलेले होते.

दुसरीकडे शिंदे गट विशेषतः मंत्री दादा भुसे यांनी नाशिक जिल्ह्यातील शिवसेनेला सुरूंग लावण्याचे काम केले आहे. ठाकरेंच्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांना शिंदे गटाकडून गळाला लावण्यात आलेले आहे. शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटक, नगरसेवक, सभापती, सोळा सरपंच आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आज शिवसेनेत म्हणजेच शिंदे गटात प्रवेश केला आहे.

प्रियांका गांधींचा राजघाटावर राहुलसाठी सत्याग्रह

पान ८ वरून

वाचवण्यासाठी आम्ही हे आंदोलन करत आहोत असे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले. यासोबतच डोंबिवली पश्चिम येथील गांधी उद्यानात सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यात डोंबिवली काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष एकनाथ म्हात्रे, डोंबिवली पूर्व विभाग अध्यक्ष अजय पॉल आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सत्याग्रहात सहभागी झाले होते.

वाशिम येथे शिक्षा होत नाही. तुम्हाला दोन वर्षांचीही शिक्षा होत नाही. तुम्हाला कुणी तुरुंगात पाठवत नाही. संसदेतून बाहेर काढत नाही. तुम्हाला निवडणूक लढविण्यापासून कोणी रोखत नाही. का? आम्ही आजपर्यंत सहन करत गेलो. आता गप्प बसणार नाही. माझ्या भावाने तुमची संसदेत गळाभेट घेऊन सांगितले की, मी तुमचा तिरस्कार करत नाही. आमची तिरस्काराची विचारधाराच नाही. मला हे विचारायचे आहे की, एका माणसाचा तुम्ही किती अपमान कराल? हीच आहे का या देशाची परंपरा?'

परिवारवादाच्या सातत्याने होणाऱ्या आरोपावरही त्या बोलल्या की, आम्हाला परिवारवादी म्हणता. मग भगवान राम कोण होते, त्यांनी आपल्या कुटुंबासाठी वनवास सोसला, त्यांनी आपल्या कुटुंबासाठी, आपल्या भूमीसाठी आपला धर्म पाळला. ते परिवारवादी होते? पांडव परिवारवादी होते? आणि आमच्या कुटुंबाचे सदस्य या देशासाठी शहीद झाले त्यासाठी आम्हाला शरम वाटली पाहिजे का? माझ्या कुटुंबाने देशासाठी रक्त सांडले आहे. या झेंड्यात त्यांचे रक्त आहे. या देशाच्या लोकशाहीला माझ्या कुटुंबाच्या रक्ताने ताकद दिली आहे. ज्यांना वाटते की, आम्हाला घाबरवून, आम्हाला अपमानित करून, धाडी टाकून आम्हाला घाबरवता येईल तर आम्ही घाबरणार नाही. आम्ही आणखी जोमाने लढू. या देशाच्या लोकशाहीची नीव काँग्रेस पक्षाच्या महापुरुषांनी घातली आहे.

प्रियांका पुढे म्हणाल्या,'मला कळत नाही की, जनतेला काय झाले आहे. तुमची सर्व संपत्ती लुटून नेत आहेत. मोजक्या उद्योगपतींना सर्व दिले जात आहे. ही राहुल गांधींची संपत्ती नाही. ही तुमची संपत्ती आहे. हे सरकारी उद्योग तुमच्यासाठी बनवले आहेत ते यांना दिले जात आहेत. छोट्या उद्योगांमधून तुमचा रोजगार येतो. अदानीकडून येत नाही. ते तुमचा रोजगार हिसकावून घेतात हे तुमच्या का लक्षात येत नाही. तुम्ही गॅस सिलिंडरसाठी हजार रुपये देता आणि इथे तुमची संपत्ती लुटली जात आहे.'

त्या म्हणाल्या, 'राहुल गांधीने काय केले? दोन प्रश्नच तर विचारले. पण त्यांची उत्तरे देता आली नाहीत तेव्हा सरकार घाबरले. जे अहंकारी असतात, तानाशाह असतात ते जेव्हा उत्तरे देऊ शकत नाही तेव्हा संपूर्ण सत्तेचा वापर करत प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज दाबू पाहतात. हे संपूर्ण सरकार, मंत्री एका माणसाला वाचवण्याचा एवढा का प्रयत्न करत आहेत? देशाची संपूर्ण संपत्ती याला दिली आहे. हा अदानी आहे कोण की ज्याचे नाव येताच सर्वजण बिथरतात आणि त्याला वाचवायला धावतात?

हा देश तुमचा आहे. ही लढाई तुमची आहे. आज लाखो तरुण बेरोजगार आहेत. अर्थव्यवस्था तेजीत पुढे जात आहे असे सांगतात तर हे बेरोजगार, महागाई का आहे? मग सरकार काय कामाचे? लोकांना घाबरवण्यासाठी आहे की अदानीला वाचवण्यासाठी आहे. तुमचे ध्यान भरकटवण्याचा सरकार प्रयत्न करते आहे,' असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

राहुल गांधींनी विदेशात जाऊन देशाचा अपमान केला, एका वर्गाचा अपमान केला असा आरोप करतात. जो माणूस कन्याकुमारी ते काश्मीर एकतेचा, समतेचा संदेश घेऊन चालला तो देशाचा अपमान करू शकतो? तो तुमच्यासाठी आवाज उठवतो आहे. जनतेच्या हक्कासाठी लढतो आहे. त्यामुळे ही एका राहुलची बाब नाही, ही संपूर्ण देशाची बाब आहे. खोटे पसरवण्याचे काम हे सरकार करत आहे. जगातल्या दोन टॉप संस्थांमधून राहुल गांधी शिकून आले आहेत, पण तुम्ही त्यांना पप्पू म्हणून हिणवले. पण नंतर हाच पप्पू देशभर चालला. मग कळले की हा तर पप्पू नाही. याच्या मागे लाखो लोक चालत आहेत. हा लोकांचे म्हणणे ऐकत आहे. हा इमानदारही आहे. नंतर याने संसदेत ते प्रश्न विचारले ज्यांची यांना उत्तरे द्यायची नाहीत. ज्या माणसाने सुरतमध्ये राहुल यांच्या विरोधात तक्रार केली, त्यानेच गेल्या वर्षी या केसवर स्टे आणला आणि एक वर्षाने त्या वेळी केस ओपन करायला गेला जेव्हा राहुल यांनी संसदेत अदानीविरोधात प्रश्न विचारले. त्यानंतर एक महिन्यात लगेच न्यायाधीशांनी शिक्षाही सुनावली. देशातल्या अनेक न्यायालयांमध्ये अनेक केसेस वर्षोनुवर्षे प्रलंबित असतात. पण या केसचा निकाल पटकन लावला, असेही त्या आपल्या भाषणात म्हणाल्या.

या देशाचे पंतप्रधान भित्रे आहेत. लावा माझ्यावरही केस, तुरुंगात टाका मलाही. पण हेच सत्य आहे. पंतप्रधान आपल्या सत्तेमागे लपले आहेत. अहंकारी आहेत. या देशाची, हिंदू धर्माची परंपरा आहे की, अहंकारी राजाला जनता उत्तर देते. माझ्या कुटुंबाने मला शिकवलेय की, हा देश मनाचे ऐकतो. हा देश सत्याचे ऐकतो. आजपासून हा बदल होईल, असा विश्वास प्रियांका यांनी शेवटी व्यक्त केला. दरम्यान, उद्यापासून काँग्रेसचे देशभर आंदोलन सुरू होत आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी स्वतः आर्थिक संकटामधून वाचले पाहिजे

■ नवी दिल्ली

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना विविध आर्थिक निकषांचे मूल्यांकन करण्यास सांगितले आहे. जागतिक बँकिंग क्षेत्रात चढ-उतार सुरूच आहेत. त्या दरम्यान, अर्थमंत्र्यांनी हे पाऊल उचलले. शनिवारी २५ मार्चला नवी दिल्लीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या प्रमुखांसोबत झालेल्या बैठकीनंतर वित्त मंत्रालयाने एक निवेदन जारी केले. 'बँकांनी कोणत्याही संभाव्य आर्थिक जोखमीपासून स्वतःचे संरक्षण केले पाहिजे', असे अर्थमंत्र्यांनी बँकांच्या प्रमुखांना सांगितले.

अर्थमंत्री सीतारामन यांच्या सूचना

'भारतीय बँकांमध्ये यूएस बँकिंग क्षेत्रातील संकटामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही संभाव्य प्रतिकूल परिणामांना तोंड देण्याची क्षमता आहे. याशिवाय अर्थमंत्री सीतारामन यांनी बँकांना व्याजदराच्या जोखमीबद्दल सतर्क राहण्यास आणि नियमित तपासणी करण्यास सांगितले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एमडी आणि सीईओ यांच्यासोबत झालेल्या दोन तासांच्या बैठकीत सिलिकॉन व्हॅली बँक आणि सिग्नेचर बँकेच्या अपयशादरम्यान जागतिक वातावरणावर खुली चर्चा झाल्याचे या अहवालात सांगण्यात आले. या बैठकीला वित्त राज्यमंत्री भगवान कराड, वित्त सेवा सचिव विवेक जोशी आणि इतर वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. बैठकीदरम्यान, अल्प आणि दीर्घकालीन अशा दोन्ही दृष्टिकोनातून येणाऱ्या जागतिक आर्थिक दबावाबाबतही अर्थमंत्र्यांनी चर्चा केली. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, 'बँकांनी त्यांच्या व्यवसाय मॉडेलकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे, जेणेकरून ते कोणत्याही प्रकारची जोखीम ओळखू शकतील.'

गारपिटीचा विदर्भातील ९१२ गावांना फटका

■ अमरावती

गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसासह गारपिटीचा पश्चिम विदर्भातील ९१२ गावांना फटका बसला आहे. यामुळे अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा व अकोला जिल्ह्यातील २६ हजार दोनशे शेतकऱ्यांच्या २०,३७६ हेक्टर शेती, भाजीपाला व फळपिकांचे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीचा यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक ६५३९ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले आहे. अमरावती जिल्ह्यासह वाशीम आणि बुलढाणामध्ये झालेल्या फळपिकांचे नुकसान मोठे आहे. तर अकोला जिल्ह्यात ३,४७६ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले आहे. या जिल्ह्यात संपूर्ण बाधित क्षेत्राचे पंचनामे आटोपल्याची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाने दिली.

राजस्थान, अरुणाचलमध्ये भूकंपाचे धक्के

■ जयपूर

गेल्या काही दिवसांपासून देशाच्या विविध भागांत सातत्याने भूकंपाचे धक्के बसत असताना आज पहाटे पुन्हा राजस्थान आणि अरुणाचल प्रदेशात भूकंपाचे सौम्य धक्के बसले. अरुणाचलच्या चांगलांगमध्ये भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल मोजण्यात आली आहे. तर राजस्थानच्या बिकानेरमध्ये ४.२ रिश्टर स्केलचा भूकंप जाणवला आहे. या भूकंपाची तीव्रता कमी असल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाली नाही. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने सांगितले की, 'आज पहाटे २.१६ वाजता बिकानेरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. त्याची खोली जमिनीच्या आत आठ किमी होती. त्याचवेळी अरुणाचल प्रदेशातील चांगलांग येथे पहाटे १.४५ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. त्याची खोली जमिनीच्या आत ७६ किमी होती. दोन दिवसांपूर्वी अरुणाचलच्या चांगलांगमध्ये गुरुवारीही भूकंपाचे धक्के जाणवले होते. दुपारी दोनच्या सुमारास १० किमी खोलीवर भूकंप झाला. त्याचवेळी भूकंपाची तीव्रता ४.२ नोंदवण्यात आली.

राहुल गांधींच्या समर्थनार्थ काँग्रेसचे सत्याग्रह

पान १ वरून

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात दुपारी १ वाजता काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार अमित झनक यांच्या उपस्थितीत संकल्प सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा व मानोरा शहरातही आंदोलन करण्यात आले. मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते पेंडॉलमध्ये बसले आहे. खासदार राहुल गांधी यांच्यावर केलेली कारवाई ही सुडबुद्धीने केली असून, याचा निषेध काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी नोंदविला. कोल्हापुरातील महात्मा गांधीजींच्या पुतळ्यासमोर बसून निदर्शने करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. याशिवाय राज्यात ठिकठिकाणी मोदी सरकार विरोधात स्वाक्षरी मोहीम देखील राबवण्यात आली.

जाहीर नोटीस

याद्वारे जनतेस सूचना देण्यात येत आहे की, **मौजे भोकरी,** तालुका भिवंडी आणि जिल्हा ठाणे येथे असलेल्या जमिनीच्या विविध वेगवेगळ्या तुकडयांच्या आणि भागांच्या **(एकत्रितपणे मालमत्ता)** संबंधातील खालील मूळ हक्कविलेख दस्तऐवज **(गहाळ दस्तऐवज)** हरवलेले आहेत/ गहाळ झालेले आहेत.

१) दिनांक ११/१०/१९९३ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-१/२७०७/१९९३
२) दिनांक ११/०२/२००३ रोजीचे कन्व्हेन्स डीड दस्त क्र. बवड-२/२४२/२००३
३) दिनांक ०३/०८/१९९५ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-१/३५५८/१९९५
४) दिनांक ०९/०७/१९९९ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-१/२५२८/१९९९
५) दिनांक २५/०१/२००० रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-१/३२९/२०००
६) दिनांक ३०/१२/२००४ रोजीचे बक्षीसपत्र दस्त क्र. बवड-१/३४५६/२००४
७) दिनांक १२/१०/२०१८ रोजीचे बक्षीसपत्र दस्त क्र. बवड-१/८४३८/२०१८
८) दिनांक २४/०२/२०१६ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-२/१२७७/२०१६
९) दिनांक ३१/१२/२०२० रोजीचे रद्दलेख दस्त क्र. बवड-२/४६०६/२०२१
१०) दिनांक ११/१०/१९९३ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-१/२७०५/१९९३
११) दिनांक २२/१०/२००२ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-२/१६६९/२००२
१२) दिनांक ०४/०८/२००६ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-२/३२८९/२००६
१३) दिनांक १०/०८/२००६ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. बवड-२/३३१८/२००६
१४) दिनांक १०/०१/२०१४ रोजीचे गहाणखत दस्त क्र. बवड-२/१७४/२०१४
१५) दिनांक १८/०१/२०१४ रोजीचे चुकदुरुस्ती पत्र दस्त क्र. बवड-२/२९६/२०१४

सर्व व्यक्तींना याव्दारे सूचित केले जाते की, वर गहाळ दस्तऐवजांच्या आधारे किंवा त्या संबंधात कोणीत्याही व्यक्ती अथवा व्यक्तींशी व्यवहार करु नयेत. वर नमूद गहाळ दस्तऐवजांच्या आधारावर किंवा त्या मालमत्तेच्या विरुद्ध त्याच्या कोणत्याही भागाबाबत कोणीही आधीपासून इतर कुठल्याही प्रकारचे हक्क, शीर्षक, हिस्सा, दावा वा हितसंबंधित केले असतील किंवा करणार असतील तर ते लिखित स्वरुपात सुचित करण्याची विनंती केली आहे. अशा व्यक्तींने/व्यक्तींनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (१४) चौदा दिवसांच्या आत निम्मस्ताक्षरीकरांस त्यांचे निम्नलिखित कार्यालयीन पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसह लेखी कळवावे. तसे न कळविल्यास सदर बाबत कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क, दावा वा हितसंबंध नाही, किंवा असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे आणि/किंवा गुंडाळून ठेवला वा त्याग केला आहे असे समजण्यात येईल आणि तो मालकांवर बंधनकारक नसेल आणि त्याच्या संदर्भातील व्यवहार पूर्ण केले जातील, याची नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

स्थळ : ठाणे
दिनांक : २७/०३/२०२३

पत्ता: दु.नं.१, कृष्णाहेरीटेज, चरई टेलिफोन एक्सचेंज जवळ, ठाणे (प.)-४००६०१.
anagha.kadam1980@rediffmail.com

सही/-
ॲड. अनघा सचिन कदम
मो. ९६१९८८६२९६

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
अँगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

नवाकाळ
मुंबई ■ सोमवार २७ मार्च, २०२३ ■ पान- ८

तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर धावपट्टीवर आदळले

कोची - भारतीय तटरक्षक दलाचे एएलएच ध्रुव मार्क ३ हेलिकॉप्टर लँडिंग करताना ते कोची विमानतळाच्या धावपट्टीवर आदळल्याची घटना आज घडली. या अपघातात एक प्रशिक्षणार्थी पायलट जखमी झाला असून, त्याचा हात फ्रॅक्चर झाला आहे. या अपघातानंतर कोची विमानतळाची धावपट्टी काही काळासाठी बंद ठेवण्यात आली होती. भारतीय तटरक्षक दलाचे हे हलके हेलिकॉप्टर आहे. हेलिकॉप्टरची रविवारी केरळच्या कोचीमध्ये चाचणी सुरू होती. उड्डाण झाल्यानंतर हेलिकॉप्टर २५ फुटांपर्यंत उंचावर गेले. त्यावेळी अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने पायलटने हेलिकॉप्टरचे कोची विमानतळाच्या धावपट्टीवर आपत्कालीन लँडिंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावेळी हे हेलिकॉप्टर धावपट्टीवर आदळले. या हेलिकॉप्टरमध्ये ३ कर्मचारी बसले होते.

अनिल भोसलेंचा जामीन अर्ज न्यायालयाने चौथ्यांदा फेटाळला

■ पुणे

शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या हजारो ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी २०१९ पासून तुरुंगात असलेले राष्ट्रवादीचे विधान परिषदेचे माजी आमदार अनिल भोसले यांचा जामीन अर्ज पुणे विशेष न्यायालयाने चौथ्यांदा फेटाळला. बँकेतील तब्बल ४९६ कोटींच्या ठेवी बनावट कागदपत्रांच्या आधारे काढून त्या लाटल्याचा अनिल भोसलेंवर आरोप आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेसह ईडीच्या पथकाकडूनही या घोटाळ्याचा तपास सुरू आहे. याप्रकरणी त्यांच्या मालमत्ताही जप्त करण्यात आल्या आहेत. मात्र त्यातून सर्व ठेवीदारांच्या ठेवी परत करणे शक्य झालेले नाही. याच मुद्यावरून भोसलेंच्या जामिनाला विशेष सरकारी वकील सागर कोठारी यांनी विरोध केला. अनिल भोसलेंकडून अजून ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात आलेल्या नाहीत आणि त्यांच्या जप्त केलेल्या मालमत्तेची किंमत ठेवी परत करण्याएवढी नाही, असा सरकारी वकिलांचा दावा होता. तर आपल्या मालमत्ता जप्त करून जमा झालेले पेसै घोटाळ्याचा आरोप असलेल्या पैशांहून अधिक असल्याचा दावा भोसलेंच्या वकिलांकडून करण्यात आला. मात्र दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने भोसलेंचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

जेएनपीटी प्रकल्पग्रस्त आंदोलनाच्या पवित्र्यात

■ उरण

जेएनपीटी साडेबारा टक्के भूखंडाचा लवकरात लवकर ताबा द्या, अशा मागणीसाठी पुन्हा एकदा आंदोलन पुकारण्याचा निर्णय प्रकल्पग्रस्तांनी घेण्यात आला असून, या आंदोलनाच्या जनजागृतीसाठी ९ एप्रिलला भव्य मेळावा घेण्याचा निर्धार या प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. जेएनपीटी कामगार वसाहतीच्या शॉपिंग सेंटरमध्ये रविवारी प्रकल्पग्रस्तांची बैठक झाली. या बैठकीत पुढील आंदोलन करण्याच्या तयारीबाबत चर्चा करण्यात आली. २०११ मध्ये लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सर्वपक्षीय आंदोलन झाले. त्यामुळे तत्कालीन केंद्र सरकार आणि जेएनपीटी प्रशासनाला प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचे मान्य करावे लागले. मंजुरीच्या १२ वर्षांनंतरही या भूखंडाचा ताबा प्रकल्पग्रस्तांना मिळालेला नाही. याचा प्रकल्पग्रस्तांमध्ये संताप आहे.

राहुल गांधींच्या समर्थनार्थ राज्यासह मुंबईत काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन

■ नागपूर

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्यात आल्यानंतर देशासह विविध राज्यांमध्ये आज काँग्रेसने मोदी सरकारविरोधात सत्याग्रह आंदोलन केले. यात महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांमध्ये, जिल्ह्यांमध्ये काँग्रेस नेत्यांनी कार्यकर्त्यांसह हाताला काळी पट्टी बांधून केंद्र सरकारचा निषेध केला. यावेळी नागपुरात जोरदार पाऊस झाला आणि या परिस्थितीत देखील काँग्रेसने आंदोलन सुरूच ठेवले. दरम्यान यावेळी नागपूरमध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी 'निसर्गही आता काँग्रेससोबत आहे,' असे म्हणत यांनी निसर्गाचे आभार मानले.

नाना पटोले म्हणाले, 'निसर्ग आता काँग्रेससोबत आहे. याआधी देखील होता. जनतेला खोटे स्वप्न दाखवून मोदी सरकार सत्तेवर आले. या जुलमी सत्तेच्या विरोधात महात्मा गांधी यांच्या विचाराने देशभरात सत्याग्रह आंदोलन देशभरात सुरू केले आहे. ललित मोदी, नीरव मोदी, गौतम अदानी आणि मेहुल चोक्सी यांना चोर म्हणणे देशात गुन्हा ठरवला जात आहे. या चोरांना आम्ही चोर म्हणू. आम्हालाही यांनी गुन्हेगार ठरवावे. जनतेचे पैसे लुटून

पळणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात ही लढाई आहे. या लढाईला आम्ही जिंकू.' मुंबईमधील काँग्रेस भवन परिसरात आज माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सत्याग्रह आंदोलन सुरू होते. देशातील राज्यघटना आणि लोकशाही » पान ७ वर

शाहरुख खानच्या मुलाच्या प्रकरणात गाजलेले अधिकारी समीर वानखडे पत्नी क्रांती सोबत नागपुरात येऊन गेले. प्रथम संघ भूमीला भेट दिली. त्यानंतर दीक्षाभूमीला भेट दिली. ते राजकारणात येण्याची चर्चा मुंबईत जोरात आहे.

सीएसएमटी स्टेशनवर मनोरुग्ण वायरच्या खांबावर चढून बसला

■ मुंबई

मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल रेल्वे स्टेशनवर शनिवारी २५ मार्चला रात्री एक मानसिक रुग्ण रेल्वे स्टेशनवर असलेला लोखंडी खांबावर चढला होता. खांबावर चढल्यानंतर हा मनोरुग्ण आत्महत्या करण्याची धमकी देत होता. त्याला बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. हा व्यक्ती मानसिक रुग्ण असल्याचे बोलले जात होते. सीएसएमटी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म ९ वर ओव्हरहेड वायरच्या खांबावर हा व्यक्ती चढला होता. यावेळी त्याने आत्महत्या करणार असल्याची धमकी दिली. हा व्यक्ती खांबावर चढल्यानंतर रेल्वे स्थानक प्रशासनाने त्याला कोणतीही इजा होऊ नये म्हणून ओव्हरहेड वायरमधील विद्युत प्रवाह बंद केला होता. यानंतर त्याला खाली उतरवण्याची अग्निशमन दलाच्या जवानांची मदत घेण्यात आली. मात्र हा व्यक्ती खाली उतरण्यास तयार नव्हता. या व्यक्तीला खाली येण्यासाठी बऱ्याचदा सांगितल्यानंतरही तो खाली येत नव्हता, यानंतर शेवटी अग्निशमन दलाच्या जवानांनी स्वतः वर चढून त्याला खाली उतरवण्याचे प्रयत्न सुरु केले. मात्र यानंतर या मनोरुग्णाने रेल्वेवर उडी मारली. यात त्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले.

नालासोपारा स्फोटके प्रकरणी आरोपीला साडेचार वर्षांनी जामीन

■ यावल

नालासोपारा स्फोटके प्रकरणी जळगाव जिल्ह्यातील साकळी येथील विजय ऊर्फ भय्या उखर्डू लोधी या तरुणास सप्टेंबर २०१८ मध्ये राज्याच्या दहशतवादविरोधी (एटीएस) पथकाने साकळी येथून अटक केली होती. तेव्हापासून लोधी हा तरुण तुरूंगात होता. या तरुणास मुंबई विशेष न्यायालयाने २१ मार्चला जामीन मंजूर केला आहे. तब्बल साडेचार वर्षांनी तरुणास जामीन मिळाला आहे. नालासोपारा येथे १० ऑगस्ट २०१८ ला एटीएसने कारवाई करून २० जिवंत बॉम्ब व बॉम्ब बनविण्याचे साहित्य जप्त करीत वैभव सुभाष राऊत यास अटक केली होती. तो सनातनचा साधक होता. त्या नंतर राज्यभरात धाडसत्रात या स्फोटक प्रकरणात वैभव राऊतसह शरद कळसकर, सुधन्वा गोंधळेकर, श्रीकांत पांगारकर व अविनाश पवार यांना अटक करण्यात आली होती. ६ सप्टेंबरला साकळी (ता. यावल) येथील वासुदेव भगवान सूर्यवंशी यास व ७ सप्टेंबरला गावातील लोधीवाड्यातील विजय ऊर्फ भय्या उखर्डू लोधी या दोघांना अटक केली होती. या संशयितांवर मुंबई, नालासोपारा, पुणे, कोल्हापूर, सोलापूर येथे घातपाती कारवाया, बॉम्बस्फोट, विशिष्ट विचारसणीचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींच्या हत्या घडवण्याचा कट असे आरोप होते व तेव्हापासून साकळी गावातील दोघे तुरूंगात होते तर यातील विजय ऊर्फ भय्या उखर्डू लोधी याने मुंबईच्या विशेष न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला.

फरारी अमृतपालला आश्रय देणाऱ्या महिलेला पटियाला येथून अटक

■ पतियाळा

पंजाब पोलिसांनी फरारी घोषित केलेल्या खलिस्तान समर्थक अमृतपाल सिंग आणि त्याच्या साथीदाराला आश्रय दिल्याच्या आरोपाखाली पतियाळा येथून एका महिलेला अटक करण्यात आली. अमृतपाल आणि त्याचा सहकारी पापलप्रीत सिंग १९ मार्च रोजी पतियाळाच्या हरगोबिंद नगर येथील बलबीर कौरच्या घरी थांबले होते. अमृतपालला आश्रय दिल्याप्रकरणी अटक करण्यात आलेली बलबीर कौर ही दुसरी महिला आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, 'अमृतपाल आणि त्याचा सहकारी पापलप्रीत सिंग हे १९ मार्च रोजी पटियालाच्या हरगोबिंद नगर येथील बलबीर कौरच्या घरी थांबले होते. बलबीर कौरने अमृतपाल आणि पापलप्रीत यांना पाच ते सहा तास आश्रय दिला आणि त्यानंतर ते हरियाणातील कुरुक्षेत्र जिल्ह्यातील शाहाबादला रवाना झाले.' अमृतपालला आश्रय दिल्याप्रकरणी अटक करण्यात आलेली बलबीर कौर ही दुसरी महिला आहे. यापूर्वी अमृतपाल आणि पापलप्रीत यांना शाहाबाद येथील घरी आश्रय दिल्याबद्दल बलजीत कौर नावाच्या आणखी एका महिलेला अटक करण्यात आली होती. अमृतपालचा सहकारी तेजिंदर सिंग गिल ऊर्फ गोरखा बाबा याला आश्रय दिल्याच्या आरोपावरून खन्ना पोलिसांनी शनिवारी बलवंत सिंग नावाच्या व्यक्तीलाही अटक केली.

डोंबिवलीत ठाकरे गटाचे ३ बॅनर अज्ञातांनी फाडले

■ डोंबिवली

गुढीपाडव्याच्या निमित्ताने डोंबिवलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मानपाडा रोडवर लावण्यात आलेले शुभेच्छा बॅनर फाडण्यात आले आहेत. याप्रकरणी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बॅनर जाणुनबुजून फाडल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. ढापरे बिल्डींग समोर लावण्यात आलेले हे तीन बॅनर्स फाडण्यात आल्याचे रविवारी सकाळी सहाच्या सुमारास निदर्शनास आले. त्यानंतर शहरप्रमुख विवेक खामकर यांनी याप्रकरणी ही तक्रार दिली आहे.

भारतीय तटरक्षक दलाचे जहाज 'वज्र' ने शनिवारी तामिळनाडू किनाऱ्याजवळ मन्नारच्या आखातात जाळ्यात अडकलेल्या सात ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवांची सुटका केली.

मुंबई-गोवा मार्गावरील कामांसाठी परशुराम घाट सात दिवस बंद

■ रत्नागिरी

कोकणात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम गेले कित्येक वर्षे सुरू आहे. या मार्गावरील चिपळूण जवळील परशुराम घाट हा २७ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात यावा, अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने या संदर्भात पोलीस, उपप्रादेशिक आणि चिपळूण महसूल विभागाकडून अहवाल मागवला आहे. त्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाणार असून, परशुराम घाट बंद ठेवण्याबाबतचे नियोजन येत्या दोन दिवसात होणार आहे. विशेषतः परशुराम घाटातील काम हे महत्वाचे असल्याने हा घाट वाहतुकीसाठी बंद करण्याची मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे. परशुराम घाटात उंच डोंगररांगा, खोल दऱ्या असल्या कारणाने चौपदरीकरणाचे काम करण्यासाठी हा भाग अवघड स्वरुपाचा आहे. तीन टप्प्यातील खोदकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित चौथ्या टप्प्याचे काम प्रगतीत असले तरी ते काम अवघड स्वरुपाचे आहे. सदर ठिकाणी काम करताना अपघात होण्याची शक्यता जास्त आहे.

अभिनेत्री आकांक्षांची आत्महत्या

■ वाराणसी

भोजपुरी अभिनेत्री आकांक्षा दुबे हिने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शुक्रवारी रात्री शूटिंग संपवून आकांक्षा हॉटेलमध्ये गेली होती. आकांक्षाने वाराणसीतील सारनाथ येथील शैलेंद्र हॉटेलमध्ये गळफास घेत जीवन संपवले. ही बाब रविवारी उजेडात आली. आकांक्षा दुबे भोजपुरी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री होती. तिच्या आत्महत्येमुळे मनोरंजन विश्वात खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे आत्महत्येपूर्वी आकांक्षा इन्स्टाग्रामवर लाईव्ह आली होती. व्हायरल झालेल्या छोट्या व्हिडिओमध्ये ती रडताना दिसत आहे. मात्र तिने हे पाऊल का उचलले हे अद्याप समजू शकलेले नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्रकरणाचा तपास सुरू केला. मिर्झापूर येथे राहणाऱ्या आकांक्षाने वयाच्या १७व्या वर्षी भोजपुरी सिनेमातून कलाविश्वात पदार्पण केले होते. तिने अनेक चित्रपटांत काम केले आहे. 'वीरों के वीर' व 'कसम पैदा करने वाले की २' या चित्रपटांमुळे आकांक्षाला लोकप्रियता मिळाली. इन्स्टाग्राम व टिकटॉकवर रील बनवून आकांक्षा प्रसिद्धी झोतात आली. भोजपुरी मनोरंजनसृष्टीत काम करणे सोपे नसल्याचे आकांक्षाने एका मुलाखतीत सांगितले होते.

२०१८ मध्ये ती नैराश्यात गेली होती. त्यानंतर तिने सिनेमापासून अंतर राखले. नव्या अभिनेत्यांना सापत्न वागणूक मिळत असल्याचा आरोपही तिने केला होता. यामुळे मोठी खळबळ माजली होती.

आपचे शिक्षणमंत्री हरजोत बैंस यांची आयपीएस ज्योती यादवांसोबत लग्नगाठ

■ चंदीगढ

कारज नांगल येथील ऐतिहासिक गुरुद्वारा विभोर साहिब येथे पंजाबचे शिक्षणमंत्री हरजोत बैंस यांनी आयपीएस अधिकारी ज्योती यादव यांच्याशी लग्नगाठ बांधली. पंजाब विधानसभेचे अध्यक्ष कुलतार सिंग संधवा यांच्यासह केवळ कुटुंबीयच यावेळी उपस्थित होते.

या लग्नानंतर काल रात्री भव्य रिसेप्शन पार्टी ठेवण्यात आली होती. या पार्टीत आपचे अध्यक्ष आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवान मान यांच्यासह अनेक आपचे नेते आणि आमदार उपस्थित होते. रूपनगर जिल्ह्यातील आनंदपूर साहिब विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदाच निवडून आलेल्या बैंस यांना भगवंत मान यांनी आपल्या सरकारमध्ये शिक्षणमंत्री बनवले आहे. ज्योती यादव २०१९ बॅचच्या अधिकारी आहेत आणि त्यांचे कुटुंब गुरुग्राममध्ये राहते. सध्या मानसा येथील पोलीस अधीक्षकपदावर ज्योती यादव आहेत.

रिसेप्शनमध्ये मान्यवरांची हजेरी

पत्रकाराचा जाहीर अपमान केला राहुल गांधींचा प्रेस क्लबकडून निषेध

■ मुंबई

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी पक्षाच्या मुख्यालयात पत्रकार परिषदेदरम्यान पत्रकाराचा जाहीर अपमान केल्याबद्दल मुंबई प्रेस क्लबने निषेध व्यक्त केला. राहुल गांधींची खासदारकी रद्द करण्यात आल्यानंतर पहिल्यांदाच त्यांची ही पत्रकार परिषद होती. यावेळी गांधींनी पत्रकार परिषदेत पत्रकाराचा उल्लेख 'भाजपचा कार्यकर्ता' असा केला आणि पत्रकाराला 'प्रेसमन असल्याचे भासवू नका' असे म्हटले. याशिवाय 'घाबरलात का?' असे म्हणत त्यांनी पत्रकाराला हिणवले. पत्रकार परिषदेत पत्रकाराचा अपमान केल्याबद्दल काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा मुंबई प्रेस क्लब निषेध व्यक्त करत, प्रेस क्लबने एक निवेदन जारी केले. या निवेदनात म्हटले आहे की, पत्रकाराचे काम प्रश्न विचारणे आहे आणि पत्रकारांशी संवाद साधून या प्रश्नांना सन्मानाने आणि सभ्यतेने उत्तरे देणे हे पत्रकार परिषद बोलावणाऱ्या राजकीय नेत्यांचे कर्तव्य आहे. देशातील सर्वात जुन्या राजकीय पक्षांपैकी काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून राहुल गांधी चौथ्या स्तंभाची प्रतिष्ठा राखण्यात अपयशी ठरले हे दुर्दैवी आहे. या संदर्भात राहुल गांधी यांनी संबंधित पत्रकाराची माफी मागावी.' असे निवेदनात म्हटले आहे. याशिवाय नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्टने देखील राहुल गांधींवर टीका करत ट्विट केले, 'लोकशाहीसाठी लढणारे राहुल गांधी, प्रश्नांवर रागावू नका. उत्तर द्या, पत्रकारांना दोष देऊ नका. माध्यमांनाही प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. राहुल गांधींच्या अशा वर्तनाचा आम्ही निषेध करतो.

सलमानला धमकी देणाऱ्याला अटक

■ मुंबई

बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानला धमकी दिल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी जोधपूरमधून आरोपी धाकड राम बिश्नोईला अटक केली. त्याने सलमानला ई-मेलद्वारे जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर सलमानच्या सुरक्षेत पोलिसांनी वाढ केली होती. सलमानला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा वांद्रे पोलीस ठाण्यात दाखल केला होता. या प्रकरणाची चौकशी करत असताना पोलीस जोधपूरमध्ये दाखल झाले. तेथून २१ वर्षीय धाकड राम बिश्नोईला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर त्याला मुंबईत आणले आणि आता त्याची पोलीस कसून चौकशी करत आहेत. त्याच्यावर पंजाबी गायक सिद्धू मूसेवालाच्या वडिलांना धमकावल्याचाही आरोप आहे.